# परमेश्वराने निवडलेले आराधनेचे स्थान

आपण प्रार्थनेसाठी आपली डोके झुकलेले असताना आपण काही क्षण उभे राहू या. आणि आता, आपली डोके झुकलेले असून, आणि मला विश्वास आहे की आपली अंतःकरणेही झुकलेली आहेत, मी विचार करतो की ह्या रात्री इथे किती जणांना एखाद्या विशेष गोष्टीसाठी, प्रार्थनेत स्मरण व्हावे असे वाटते? काय तुम्ही फक्त तुमचे हात वर कराल, व म्हणाल, "परमेश्वर, आज रात्री मला ते दे जे मी शोधत आहे." प्रभू तुम्हाला आशिषित करो.

2 आमचे स्वर्गीय पिता, आम्ही आता नम्रतेने कृपेच्या महान सिंहासनाजवळ येत आहोत, विश्वासाने, आम्ही पलीकडे जात आहोत; जिथे परमेश्वर, आणि दूत, आणि करुब, आणि सर्व स्वर्गीय सेना एकत्र जमले आहे. कारण त्याने म्हटले की स्वर्गीय पित्याला कळल्याशिवाय चिमणीही जमिनीवर पडू शकत नाही. जेव्हा शेकडो लोक आपले मस्तक झुकवून आहेत, तेव्हा तो इथे किती अधिक जाणतो, आणि तुझ्याकडे विशेष विनंत्या करत आहे. पिता, आजच्या रात्री गरजू जगाकडे खाली पाहा, कारण आम्ही गरजवंत लोक आहोत.

3 आणि मी प्रार्थना करतो, देवा, कारण की आम्ही इथे एकत्र आलो आहोत आणि प्रार्थनेचे उत्तर देणाऱ्या जीवंत देवामध्ये आमचा विश्वास तुझ्यापुढे व्यक्त करतो; आपण ह्या जगातून बाहेर आलो आहोत ज्यांची सुंता न झालेली आहे, हृदय आणि कानाचे, वेगळे जीवन जगण्यासाठी बाहेर आलो आहे, आणि तुझ्यामध्ये आमचा विश्वास कबूल करून जगण्यासाठी. आज रात्री आम्ही आपले हात वर केले आहेत, आणि म्हणत आहोत, "आम्ही गरजवंत आहोत." प्रिय परमेश्वर, त्यांच्या प्रत्येक विनंतीचे उत्तर दे.

4 आणि मग, पिता, आम्ही प्रार्थना करतो की तू आज रात्री वचनात आम्हाला भेट दे. आम्ही इथे सुधारणेसाठी, समजण्यासाठी आलो आहोत, ह्यासाठी की आम्हाला ह्या वर्तमान दिवसात कसे राहायचे आहे ते कळेल; काय अपेक्षा करावी, काय करावे. कारण, आपल्याला माहीत आहे की, प्रभूचे आगमन जवळ आहे, जसे सर्व चिन्हांप्रमाणे भविष्यवक्तांनी सांगितले होते. प्रभू, आम्ही त्या वेळेच्या जवळ येत आहोत, जेव्हा तुझ्या मुलांना संपूर्ण मुक्ती दिली जाईल. देवा, आपण प्रत्येकजण, तिथे असू दे, पिता. होऊ दे एकही हरवू नये. प्रभू, हाच आमचा इथे असण्याचा उद्देश आहे. आम्ही तुझ्यावर प्रेम करतो, आणि त्या क्षणासाठी तयारी करण्याचा प्रयत्न करत आहोत.

5 आज रात्री आमच्याशी बोल, आम्ही पुन्हा मागतो. आणि आजारी लोकांना बरे कर. सर्व आजारी आणि पीडीत जे इमारतीत आहेत, आम्ही प्रार्थना करतो की, प्रभू, तू त्यांना बरे कर; आणि विशेष करुन ज्यांना आत्मिक गरजा आहेत. आम्ही प्रार्थना करतो की तू हरवलेल्या प्रत्येक प्राणाला वाचवशील. प्रत्येक विश्वासीला पवित्र आत्म्याने भर. आणि तुझ्या विश्वास करणाऱ्या मुलांमध्ये शक्ती आणि सामर्थ्य नव्याने निर्माण कर. पिता, ह्या गोष्टी प्रदान कर. आम्ही पुष्कळ मागतो, कारण तू आम्हाला मागण्यास सांगितले, "विपुलतेने मागा, महान गोष्टी मागा, त्यांतील अनेक," यासाठी की आपला आनंद परिपूर्ण व्हावा. आणि आम्ही त्यांना येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो. आमेन.

बसू शकता.

6 मी निश्चितच आजच्या रात्री हा एक मोठा सौभाग्य समजतो, पुन्हा इथे मंचावर, इथे ह्या हायस्कूलमध्ये असल्याचा, ह्या चांगल्या लोकांचा समोर येण्यासाठी जे सुसमाचार ऐकण्यासाठी एकत्र आले आहेत. मी परमेश्वराकडे दया मागतो की मला जितके सत्य माहीत आहे ते तुम्हाला सांगण्यास मदत करावी। तो अजूनही मनुष्याचे तोंड बंद करु शकतो, जसे तो सिंहाचे तोंड बंद करु शकतो. आणि जर मी कधी काही बोलण्याचा प्रयत्न करील जे चुकीचे आहे आणि त्याच्या इच्छेच्या विरुध्द आहे, माझी प्रामाणिक प्रार्थना आहे की त्याने माझे तोंड बंद करावे, की मी ते बोलू नाही. कारण, खरोखर, मला स्वतःला, स्वर्गात जायचे आहे; आणि मी कधीच तिथे पोहोचणार नाही, आणि त्याशिवाय, मी खोटा मार्गदर्शक ठरेन, कोणीतरी ज्याने काहीतरी खोटेपणा केले आहे. जर मी ते करतो, तर ते यामुळे आहे की मला वेगळे काही माहित नाही. प्रभू तुम्हाला आशिषित करो.

7 आता, उद्या सकाळी, जर देवाची इच्छा असेल, तर माझा त्या विषयावर बोलण्याचा उद्देश आहे, *विवाह आणि घटस्फोट.* आणि आम्हाला विश्‍वास आहे की तुम्ही येणार, आणि तुमच्या पेन्सिली आणि कागद घेऊन येणार. आपण जास्त वेळ घेणार नाही, परंतु मला हे करायला आवडेल…प्रथम, इंडियाना इथे परत येण्याचा माझा उद्देश हा होता की, मी तुम्हाला तसे वचन दिले आहे. आणि मी उद्या सकाळी, प्रयत्न करीन. जर मला उद्या सकाळी मिळाले नाही, तर मी उद्या रात्री येईल. परंतु मी उद्या सकाळी प्रयत्न करीन, जर प्रभूची इच्छा असेल, तर ह्या विषयावर, दोन विचारधारा बोलण्याचा. आणि परमेश्वर आपल्याला सत्य काय आहे हे समजण्यास मदत करो, सत्य काय आहे हे समजण्यासाठी, जेणेकरून आपण सत्यात आणि प्रकाशात चालू शकू. आम्ही…

8 तुम्हाला माहीत आहे, एक जुना अश्वेत मित्र होता. तो मला म्हणाला, तो म्हणाला, "भाऊ बिली," तो म्हणाला, "मला—मला नदीवर कोणताही त्रास नको आहे." तो म्हणाला, "मला माझे तिकीट माझ्या हातात ठेवायचे आहे. आणि जेव्हा शिटी वाजते, मला तिथे कोणतीही अडचण नको. मी खूप आधी, प्रभूकडे मागितले आहे, जर काही चुकीचे असेल, तर मला आताच ते बरोबर करू दे," म्हणाला, "कारण त्या सकाळी जहाज दुसऱ्या किनाऱ्याकडे निघेल तेव्हा अंधार आणि वादळ असेल." म्हणाला, "मला कुणाचाही अडथळा नको आहे. मला आता ह्या सर्वांची काळजी घ्यायची आहे." त्यासाठीच आपण इथे आहोत, सर्व अडथळ्यांची काळजी घेण्याचा प्रयत्न करतो, ह्यासाठी की आपण त्या वेळी जहाजावर चालू शकू.

9 आता, आज रात्री मी तुमच्याशी फार वेळ बोलणार नाही, कारण उद्या आपल्याकडे दोन सभा आहेत. आणि मग मी लगेच, कुठेतरी, दुसऱ्या, अजून सभेसाठी जाईल.

10 परंतु, आता, व्यवस्थाविवरणाच्या पुस्तकात. मला 16वा अध्याय, व्यवस्थाविवरण 16:1 ते 3 मधील, पहिली तीन वचने वाचायची आहेत.

> *अबीब महिन्यात लक्षात ठेवून, आणि पर्व पाळा…प्रभू तुमचा परमेश्वर:… अबीबच्या* (चौथ्या) *महिन्यात तुमचा देव परमेश्‍वर याने तुम्हाला रात्रीच्या वेळी मिसरदेशातून बाहेर काढले.*
>
> *तिथे पर्वचा यज्ञपशू परमेश्वराला अर्पण करा, शेळ्यामेंढ्या किंवा गाय बैल यांपैकी हा पशु असावा, ज्या ठिकाणी परमेश्वराने त्याचे नाव ठेवण्यासाठी* निवडले आहे.

11 आता, आज रात्री माझा विषय आहे: *परमेश्वराने निवडलेले आराधनेचे स्थान.*

जर तुम्ही पाहाल, तर महिना अ–बी–बी...–ब तिथे, अर्थ आहे, "एप्रिल." एप्रिल महिन्यात त्यांना बाहेर आणले गेले.

आणि आता विचित्र गोष्ट अशी आहे की आपण आजच्या रात्री, देवाचे उपासक म्हणून, ह्या दिवसात ज्यात आपण राहत आहोत, आणि आपण लोकांच्या निरनिराळ्या कल्पना पाहतो. आणि जोपर्यंत त्या गोष्टीविषयी भिन्न कल्पना आहेत, तिथे भिन्न प्रश्न आहेत; विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे एक खरे उत्तर असलेच पाहिजे.

जर मी प्रश्न विचारला, "हे काय आहे?"

"बरं," ते म्हणतील, "एक टेबल."

"ते कशासाठी आहे?" पाहिले?

12 आता, तिथे, कोणीतरी म्हणेल, "ते टेबल नाही. तो एक फळा आहे." बरं, ते एक फळी आहे, परंतु तरीही ते एक टेबल आहे. तुम्ही पाहा, त्याचे खरे उत्तर असले पाहिजे.

आणि जर मी एखाद्या गोष्टीबद्दल प्रश्न विचारला, तर त्याचे खरे उत्तर असलेच पाहिजे. त्याच्या जवळपास काहीतरी असू शकते; पण प्रत्येक प्रश्नाला खरे, थेट उत्तर असलेच पाहिजे. तर, म्हणूनच, प्रत्येक प्रश्न जो आपल्या जीवनात येतो, तिथे एक खरे, बरोबर उत्तर असलेच पाहिजे.

13 आणि आता, आज, आपण असे म्हणताना ऐकतो—ऐकतो की, आज जगात आपले बरेच लोक...

एक मिशनरी म्हणून, त्याने समुद्रपार आणि जगभर अनेक प्रवास केले आहेत, मी अनेक वेगवेगळ्या धर्मांच्या संपर्कात आलो आहे, जसे बुद्ध, आणि मुसलमान, आणि शीख, आणि जैन, आणि आणखीन इतर, जगातील धर्म. आणि मग इथे आपल्या स्वतःच्या युनायटेड स्टेट्समध्ये; आणि इतर परदेशी देश, आपल्या सर्व विभिन्न मंडळ्यांना भेटतो, जसे आपल्या संप्रदायिक मंडळ्या आहेत, रोमन कॅथलिक पासून सुरुवात करून, आणि नंतर ग्रीक, आणि अशाप्रकारे, आणि ते—ते विविध विधी, आणि मग पुढे... सर्व संप्रदायांच्या युगांमध्ये, नऊशेहून अधिक वेगवेगळ्या प्रोटेस्टंट संप्रदायांमध्ये...

आता, त्यापैकी प्रत्येकाचे विचार, तुम्ही पाहू शकता, आणि मी त्यांना दोष देऊ शकत नाही. प्रत्येकजण दावा करतो की ते सत्य आहेत, त्यांच्याकडे सत्य आहे. आणि ते लोक जे त्या मंडळ्यांच्या सदस्य आहेत ते विश्वास ठेवले पाहिजे, कारण त्यांनी त्यांचे—त्याचे मुक्कामाचे ठिकाण, त्यांचे सार्वकालिक मुक्काम, त्या मंडळीच्या शिकवणीवर लावले आहे. आणि ते एकमेकांपासून इतके भिन्न आहेत, की ते नऊशेहून अधिक वेगळे प्रश्न निर्माण करतात.

म्हणून, नऊशेहून अधिक वेगळे प्रश्न असल्याने, तिथे एकच बरोबर उत्तर असले पाहिजे. आणि मला आज रात्री आपल्यासाठी असे वाटते, कारण आपण स्वर्गात जाण्याचा प्रयत्न करीत आहोत, आणि आपल्या प्रभु येशूला भेटण्यासाठी ज्याला आपण सर्वजण प्रेम करतो, मला ते शोधण्यासाठी शास्त्रवचनात शोधाला आवडेल.

14 आता, जर हा बायबलचा प्रश्न आहे, तर त्याचे बायबलमध्ये उत्तर असले पाहिजे. ते एखाद्या मनुष्यांच्या समुहातून, किंवा कोणत्याही विशिष्ट संघटनाकडून येऊ नये, किंवा एखाद्या शिक्षकाकडून, किंवा एखाद्या संप्रदायाकडून. ते थेट वचनातून आले पाहिजे, जिथे देवाचे भेटण्याचे स्थान आहे, उपासनेसाठी. आणि निश्चितच, परमेश्वर असल्यामुळे, तिथे कुठेतरी एक भेटण्याचे स्थान आहे, जिथे तो भेटतो.

15 आता, आपण इथे व्यवस्थाविवरणाच्या पुस्तकात पाहतो की, सुरुवातीला, मोशे शास्त्रलेख पुन्हा सांगत आहे, ज्या गोष्टी त्याने त्यांना सांगितल्या, कशाप्रकारे त्याने त्यांना मोठ्या, बलवान भुजाने, मिसरमधून बाहेर आणले, आणि प्रथम त्यांची स्थापना केली.

ते मिसरमधून बाहेर येईपर्यंत त्यांना "देवाचे लोक" म्हटले गेले, आणि नंतर त्यांना "देवाची मंडळी" म्हटले गेले. कारण, चर्च म्हणजे एकत्र जमणे, किंवा खरं तर, *चर्च* म्हणजे "बाहेर बोलावलेले लोक," म्हणजे ज्यांना बाहेर बोलावले गेले आहे ते. आणि ते मिसरमधून मंडळी बनण्यासाठी बाहेर आले.

16 आता परमेश्वराने त्यांना सांगितले, जेव्हा त्यांनी...मंदिराची स्थापना करण्यापूर्वी आणि त्यांनी जे काही केले, "मी माझ्या आराधनेसाठी स्थान निवडीन, आणि मी त्यामध्ये माझे नाव ठेवीन." आणि हेच एक स्थान आहे जिथे परमेश्वर, त्याच्या स्वतःच्या निवडीद्वारे कोणालाही भेटू शकतो. त्याने त्याचे स्थान निवडले, आणि जिथे त्याने त्याचे स्थान निवडले, त्याने त्याचे नाव ठेवले, येथील दुसऱ्या वचनात आपल्याला सांगितले आहे की; तो त्याचे नाव त्या ठिकाणी ठेवील जे त्याने लोकांना त्याची आराधना करण्यासाठी निवडले होते. आता, गोष्ट अशी आहे की, आपल्याला ते स्थान कुठे आहे ते शोधायचे आहे.

17 नऊशे आणि काही वेगळ्या कल्पनांसह, आपण सर्व मूर्तिपूजक धर्म बाजूला ठेवत आहोत, आणि फक्त ख्रिस्ती धर्माविषयी बोलत आहे. म्हणजे, मला मूर्तिपूजकांबद्दल एक भावना आहे, नाहीतर मी तिकडे जाऊन त्यांच्याशी बोललो नसतो. परंतु, ते चुकीचे आहेत. ख्रिस्ती हा एकच धर्म आहे जो खरा आहे, तो ख्रिस्ती आहे. आणि मी तसे म्हणत नाही कारण मी एक ख्रिस्ती आहे; कारण, मी विश्वास करतो की ते सत्य आहे. हा एकच धर्म आहे जो बरोबर आहे.

18 मी त्या कबरेवर गेलो आहे जिथे दर चार तासांनी पांढरा घोडा बदलला जातो. जिथे, मोहम्मद, एक महान याजक आणि—आणि ख्रिस्तानंतर लगेच अगुवा होता, तो बहुधा एक भविष्यवक्ता असावा, आणि मला यात शंका नाही की तो कोण होता, मक्काबी बंधू नंतरचाच. परंतु जेव्हा ते...तो मेला. त्याने दावा केला की तो पुन्हा उठेल आणि सर्व जग जिंकेल. आता, सुमारे प्रत्येक चार तासांनी ते पहारेकरी बदलतात, आणि ते त्याच्या कबरेजवळ एक पांढरा घोडा ठेवतात. ते, दोन हजार वर्षांपासून, अपेक्षा करीत आहेत की तो पुन्हा उठेल आणि जग जिंकेल. पण तुम्ही पाहा...

19 आणि तुम्ही बुद्धाकडे जाता; बुद्ध शेकडो वर्षे जगला, सुमारे तेवीसशे वर्षांपूर्वी, जपानचा—चा देव. आणि म्हणून तो एक तत्वज्ञानी होता, काहीतरी कन्फ्यूशियससारखा, आणि इत्यादी.

परंतु हे सर्व...संस्थापक, आणि असेच इतर, ते सर्व त्यांच्या तत्वज्ञानासह मेले, आणि पुरले गेले आणि कबरेत गेले आहे.

परंतु ख्रिस्ती धर्म, ज्याची स्थापना येशू ख्रिस्ताने केली आहे, तिथे एक रिकामी कबर आहे. तो एकटाच मनुष्य होता जो पृथ्वीवर उभा राहिला, आणि जिवंत राहिला आणि म्हणाला, "माझ्याकडे माझे जीवन देण्याचे आणि पुन्हा उठविण्याचे सामर्थ्य आहे." आणि त्याने तसे केले. आणि तो आज जीवंत आहे.

आणि आपल्याला ठाऊक आहे की तो जीवंत आहे, कारण तो आपल्याबरोबर आहे आणि स्वतःला भौतिक चिन्हे आणि चमत्कारांद्वारे सिद्ध करतो, की त्याने अभिवचन दिले आहे की तो ते दाखविण्यासाठी करील. जसे की, अग्नीचा स्तंभ इस्राएलच्या मुलांना रानातून मार्गदर्शन करत होता, तसाच तो आज आपल्याबरोबर आहे, त्याचे चित्रही घेतले

गेले आहे; चिन्हे आणि आश्चर्यकर्म करीत आहे जी त्याने अभिवचन दिले होते की तो ह्या दिवसात करील, त्याने अभिवचन दिलेली सर्व वचने ह्या दिवशी प्रकट होत आहेत. म्हणून, बाकीचे मूर्तिपूजक जग बाहेर आहे. हेच ख्रिस्ती आहे!

20 आता, नऊशेहून अधिक प्रश्न आहेत याविषयी की परमेश्वर कोठे भेटतो, "तो मेथडिस्टला भेटतो, किंवा तो बाप्टिस्टमध्ये भेटतो, आणि तो *ह्या* मध्ये, आणि *त्या* मध्ये, आणि *इतर* जागेत भेटतो." आता, तिथे एक प्रश्न आहे, म्हणून प्रत्येकाने भीतीनी आणि थरथरत स्वतःचे तारण शोधले पाहिजे.

परंतु आज रात्री मला वचनलेखात शोधण्याचा आणि सिध्द करण्याचा प्रयत्न करायचा आहे, की योग्य स्थान कुठे आहे जिथे परमेश्वर लोकांना भेटतो आणि त्यांच्या सोबत उपासना करतो. आणि, जर ते असे आहे, तर तेच एक स्थान आहे जिथे तो भेटेल.

21 आता, आपण हा विषय व्यवस्थाविवरण मधून घेतला आहे. हा एक ग्रीक शब्द आहे ज्याचा संयुक्त अर्थ आहे, किंवा, त्याचा अर्थ आहे, "दोन नियम." ग्रीक शब्द, व्यवस्थाविवरण, म्हणजे, "दोन वेगळे नियम."

आणि तेच देवाकडे आहे, दोन वेगवेगळे नियम. आणि त्यांतील एक मृत्यूचा नियम आहे, आणि दुसरा जीवनाचा नियम आहे. परमेश्वराचे दोन नियम आहेत. त्याचे अनुकरण करणे, आणि त्याची सेवा करणे आणि त्याची आराधना करणे, हे जीवन आहे; नाकारणे हा मृत्यू आहे. परमेश्वरामध्ये दोन नियम आहेत.

22 आता, त्यांतील एक नियम सीनाय पर्वतावर, जगाला ओळ–...ओळखण्यात आला. देवाने मोशे आणि इस्त्राएलला नियम दिले. असे नाही की नियम त्यांना मदत करु शकेल, परंतु नियमने त्यांना दाखवले की ते पापी होते. त्या वेळेपर्यंत, त्यांना पाप म्हणजे काय हे माहिती नव्हते, जोपर्यंत त्यांच्याकडे नियम नव्हता. दंडाशिवाय नियम असू शकत नाही. नियम हा दंडाशिवाय नियम नसतो. तर, म्हणून, "नियमाचे उल्लंघन हे पाप आहे, आणि पापाची मजुरी मृत्यू आहे." म्हणूनच, परमेश्वराने त्यांना नियम दिल्यापर्यंत, त्यांच्यासाठी कोणतेही उल्लंघन गणले नाही.

जर कोणताही नियम नाही की तुम्ही एका तासात वीस मैलांहून अधिक धावू शकत नाही, तर तुम्ही वीस मैल एका तासात धावू शकता. परंतु जेव्हा एखादा नियम सांगतो की तुम्ही ते करु शकत नाही, तेव्हा त्यामागे एक नियम आणि दंड आहे.

23 आता, मृत्यू, मृत्यूचा नियम, सीनाय पर्वतावर दिलेल्या आज्ञा होत्या, ज्या मनुष्याला सांगते की तो पापी आहे. आणि, परमेश्वराच्या नियमांचे उल्लंघन करून, तो मेला. परंतु नियमात तारण नाही. तो...फक्त एक पोलीस होता जो तुम्हाला तुरुंगात टाकू शकतो; त्याच्याकडे तुम्हाला बाहेर काढण्यासाठी काहीच नव्हते.

परंतु नंतर त्याने दुसरा नियम दिला, तो कलवरीच्या डोंगरावर होता, जिथे पाप येशू ख्रिस्तामध्ये गणले गेले, आणि तिथेच त्याची शिक्षा भरली गेली. आणि याने नाही...नियमाशिवाय, "परंतु कृपेने तुमचे तारण झाले आहे," देवाच्या कृपेने, तुमच्या अस्तित्वाला देवाच्या पूर्वज्ञानात पहिल्यापासून ठरवल्याद्वारे.

24 आता आपण हे दोन नियम पाहतो, व्यवस्थाविवरण, दोन नियमांविषयी बोलत आहे. तिथे दोन नियम होते. एक मृत्यूचा नियम होता, आणि दुसरा जीवनाचा नियम होता.

25 लोकांना दोन वाचा दिले होते. आपण त्यांच्याविषयी सकाळी बोलणार आहोत.

त्यांच्यातील एक आदामला अटीवर देण्यात आला, "*हे* केले तर आणि *ते* करू नकोस," परंतु तो नियम तोडला गेला. आदाम, हव्वेने, ते एदेन बागेत तोडले.

मग परमेश्वराने दुसरी वाचा केली, आणि ती अब्राहामाला दिली, आणि तो नियम बिनशर्त होता. "तुम्ही काय केले आहे किंवा तुम्ही काय कराल हे नाही;" तो म्हणाला, "मी ते आधीच केले आहे." ती कृपा आहे. हाच जीवनाचा नियम आहे. देवाने ते अब्राहामासाठी केले आणि त्याच्यानंतर त्याच्या वंशासाठी, ते म्हणजे, अब्राहामाचे सर्व अंश आहे.

जसे बायबल म्हणते, "सर्व इस्त्राएल वाचले जातील," परंतु त्याचा अर्थ यहुदी नाही. जसे पौलाने म्हटले, "जो आतून इस्त्राएल आहे, किंवा बाहेरून इस्त्राएल." "बाहेरून," जसे आपण त्या रात्री बोललो, ते इसहाकची मुले होती, शारीरिक जन्माने. परंतु परमेश्वराचे नियम ख्रिस्ताद्वारे होते, जो अब्राहामाचा शाही वंश होता, की, "कृपेने सर्व इस्त्राएल वाचले आहे." ते म्हणजे, "जे सर्व ख्रिस्तामध्ये आहेत त्यांचे तारण झाले आहे," परमेश्वराची दुसरी वाचा. पण ह्या सर्व गोष्टी ख्रिस्ताची पूर्वछाया देत होत्या.

26 आता 2ऱ्या वचनाकडे पाहा. व्यवस्थाविवरण 16 मधील 2रे वचन, "मी निवडलेल्या जागेत आराधना कर." आता तुम्ही परमेश्वराची आराधना केली पाहिजे, तो म्हणाला, "मी निवडलेल्या जागेत," त्यात नाही जे कोणी दुसऱ्याने निवडले आहे, परंतु, "मी जे निवडले आहे."

आता, जर परमेश्वराने एखादे स्थान निवडले आहे, तर आपल्याला हे जाणून घेणे आवश्यक आहे की त्याने त्याबद्दल काय सांगितले आहे. आणि ते कोठे आहे? मला ते शोधायचे आहे, कारण, खरोखर, मला त्याची आराधना करायची आहे.

आपण सर्व इथे आज रात्री, त्याची आराधना करण्यासाठी आहोत. आज रात्री आपण येथे बसलो आहोत, मेथोडिस्ट, बॅप्टिस्ट, कॅथलिक, यहोवाच्या साक्षीदार, ख्रिश्चन सायन्स आणि इतर सर्व म्हणून, परंतु आपण सर्व काहीतरी शोधत आहोत.

आपल्याला सत्य जाणून घ्यायचे आहे. बायबल म्हणते, "तुम्हाला सत्य समजेल, आणि सत्य तुम्हाला स्वतंत्र करील."

कोणीतरी, तुला काय करत आहे हे कळू शकत नाही, तुम्हाला ते कसे करावे हे कळत नाही जोपर्यंत तुम्हाला ते कसे करावे हे कळत नाही; तुम्हाला कळत नाही की काय करावे जोपर्यंत तुम्हाला कळत नाही की ते कसे करावे. आपण काय करत आहात आणि ते कसे करावे हे आपल्याला माहित असले पाहिजे.

27 हे आपल्याला दाखवते की देवाकडे त्याच्या उपासकांसाठी एका ठराविक स्थान, सभेचे ठिकाण आहे. त्या जागी, फक्त, परमेश्वर त्याच्या उपासकांना भेटतो.

28 आता, त्याने त्याच्या उपासकांसाठी जे स्थान निवडले आहे, त्याने दावा केला की तो त्याचे नाव ठेवेल. आता आपण शोध घेऊया आणि वचनाद्वारे, पाहूया, हा स्थान कोठे आहे. निश्चितच, जर परमेश्वराने म्हटले तो त्याचे नाव ह्या स्थानात ठेवेल जिथे त्याने लोकांना भेटण्यासाठी निवडले होते आणि त्यांच्याबरोबर आराधना करण्यासाठी...किंवा ते त्याची आराधना करण्यासाठी, खरं तर, ते हे कुठेतरी बायबलमध्ये आहे, कारण ते सर्व युगांसाठी होते.

29 आणि महान न बदलणारा परमेश्वर बदलू शकत नाही. मनुष्य बदलतो. पण देवाने कधीही जे काही सांगितले आहे त्यावर तुम्ही तुमचे जीवन ठेवू शकता, कारण ते सत्य आहे. ते सत्य आहे. कारण, तीच एक गोष्ट आहे ज्यावर मी भरवसा ठेवू शकतो, ते म्हणजे बायबल. कारण, मनुष्याचे शब्द अपयशी ठरेल, परंतु परमेश्वर सर्वोच्च आहे.

मला गेल्या वर्षीपेक्षा ह्या वर्षी अधिक माहित असले पाहिजे. तुम्हाला सुध्दा, प्रत्येक दिवशी, असले पाहीजे. आपण मर्यादित आहोत, म्हणून आपण ज्ञान मिळवतो.

पण परमेश्वर अनंत आहे. तो अनंत आहे. आणि, अनंत असल्यामुळे, तो ज्ञान मिळवू शकत नाही. सुरुवातीपासूनच, तो परिपूर्ण आहे. प्रत्येक निर्णय अगदी बरोबर असला पाहिजे.

30 आणि देवाने एकदा जशी कृती केली, त्याला कायम तसेच करावे लागते, अन्यथा त्याने पहिल्यांदा चुकीचे केले असे ठरेल. जर एखादा मनुष्य देवाकडे तारणासाठी येतो, ज्या आधारावर त्याने त्याचा स्विकार केला, ते प्रत्येक वेळी त्याच आधारावर स्वीकारले पाहिजे. ते बरोबर आहे. जर एखादा मनुष्य दैवी आरोग्यासाठी देवाकडे येतो, आणि देवाने त्याला एका विशिष्ट आधारावर स्विकार केला, जेव्हा दुसरा मनुष्य येतो, त्याने त्याला त्याच प्रकारे स्विकारले पाहिजे, अन्यथा त्याने चूक केली जेव्हा त्याने पहिल्या मनुष्याचा स्विकार केला. परमेश्वराने एक आधार बनवला ज्यावर तो मनुष्याला भेटेल. त्याने आधार दिला की तो काय करील, तो ते कसे करील, आणि ते एदेन बागेत अर्पण केलेल्या कोकऱ्याच्या रक्ताद्वारे होते. देवाने कधीच, कधीच, कधीच ते बदलले नाही.

31 त्याने ठरवले की तो मनुष्याला कसा तारणार. पण आज आपण मनुष्याला त्यात शिक्षणाने आणण्याचा प्रयत्न केला आहे; आपण त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला, त्यांना शिक्षित करण्याचा प्रयत्न केला, संप्रदाय करण्याचा प्रयत्न केला, अशा इतर सर्व प्रकारच्या गोष्टी करण्याचा प्रयत्न केला; त्यांना आत आणा, हलवून आणा, बाप्तिस्मा देऊन आणा, ज्या ज्या मार्गांनी शक्य आहे त्या सर्व मार्गांनी आणा, पत्रांद्वारेही त्यांना आणा. पण तरीही ते तसेच राहते, परमेश्वर मनुष्याला कोकराच्या ओतलेल्या रक्ताखाली भेटतो. सुरुवातीला रक्त हा परमेश्वराचा मार्ग होता, आणि आज रात्री रक्त हा परमेश्वराचा मार्ग आहे. प्रायश्चित्त करणे आणि अशा सर्व गोष्टी करणे चांगले आहे, पण तारण फक्त रक्ताद्वारेच मिळते. रक्त हा एकच मार्ग आहे जो परमेश्वराने मनुष्याला वाचविण्यासाठी निवडला आहे, आणि तो त्याला बदलू शकत नाही.

32 ईयोबाकडेही तेच होते. त्याला ठाऊक होते की तो धर्मी आहे, कारण त्याने देवाने त्याच्याकडून मागितलेला तो—तो बलिदान अर्पण केला होता.

33 आता, आपण आता शोध घेऊया की हा स्थान कोणता आहे, आणि ज्या स्थानात त्याने त्याचे नाव ठेवले आहे. आपल्याला हे शोधावे लागेल की त्याने त्याचे नाव कुठे ठेवले आहे. मग, जर आपल्याला कळते की देवाचे नाव काय आहे आणि त्याने ते कुठे ठेवले आहे, मग आपण ते शोधताच आपल्याला आराधनेचे स्थान मिळते.

ह्या सर्व गोष्टी, अर्थातच, ह्या पुढे येणाऱ्या गोष्टींच्या छाया होत्या. संपूर्ण व्यवस्था ही येणाऱ्या गोष्टींचे पूर्वछाया होते.

34 जसे, चंद्र ही सूर्याची छाया आहे. तो सूर्याच्या अनुपस्थितीत सेवा करतो, जसे मंडळीने देवाचा पुत्राच्या अनुपस्थितीत सेवा करावी. पुत्राच्या अनुपस्थितीत, कमी प्रकाश, असलेली मंडळी, विश्वासी, देवाची सेवा करतात आणि पुत्राच्या अनुपस्थितीत प्रकाश देतात. परंतु जेव्हा सूर्य उगवतो, तुम्हाला चंद्र दिसणार नाही, कारण तो खाली गेला आहे. त्याला आता त्याच्या प्रकाशाची गरज नाही, कारण त्याला फक्त, सूर्यापासून प्रकाश मिळतो. आता, जसे पती आणि पत्नी, सूर्य आणि चंद्र हे, मंडळी आणि ख्रिस्त आहेत.

35 आता आपण पाहतो, की, ह्या गोष्टी ख्रिस्ताची छाया आहेत. प्रत्येक बलिदान, पर्व, आणि जुन्या करारातील प्रत्येक गोष्टी, ख्रिस्ताची पूर्वछाया होती; जशी सावली जमिनीवर पडते. आता आपल्याला योग्य आराधनेचे स्थान शोधायचे आहे, इथे जुन्या करारात परत जाऊन जिथे हे दिले होते आणि पाहावे की ह्या गोष्टी काय आहेत.

36 आता, जेव्हा सावली जमिनीवर येते, तुम्ही सांगू शकता की ते पुरुष आहे, स्त्री आहे, प्राणी आहे किंवा काहीही असो, कारण ते जमिनीवर सावली टाकते. आणि जसजशी ती सावली लहान होत जाते, सावली ही नकारात्मक असते; आणि नकारात्मकाशिवाय सकारात्मक असू शकत नाही. म्हणूनच, जेव्हा सकारात्मक नकारात्मकाच्या जवळ येते, तेव्हा नकारात्मक सकारात्मकामध्ये विलीन होते. छाया आणि—आणि सकारात्मक एकत्र येतात, आणि त्यामुळेच ते सकारात्मक बनते.

आणि जर "सर्व जुन्या गोष्टी," बायबल म्हणते, "जुन्या करारात, भविष्यातील गोष्टींची छाया होती," तर म्हणून ख्रिस्त हा येणाऱ्या गोष्टींची छाया होता.

37 तर आपण जुन्या कराराच्या प्रकारांद्वारे पाहू शकतो, जिथे त्याने त्याचे नाव ठेवण्याची निवड केली, आणि...आतासाठी. आता, जशी सावली...जेव्हा जमिनीवरून जाते, मी म्हणालो, ती नकारात्मक आहे, एक प्रकार म्हणून, म्हणून आपण, उपासक, सुध्दा जुन्या कराराच्या सावल्या नविनाच्या सकारात्मकतेत लुप्त होताना पाहू शकतो.

38 आता, सर्व पर्व, सुट्ट्या, सर्व तंबू, सर्व लाकूड, तंबूमधील प्रत्येक गोष्ट, प्रत्येक गोष्ट ख्रिस्ताचे प्रतीक होती. सर्व अर्पण, सर्व नियम, प्रत्येक गोष्ट ख्रिस्ताचे प्रतीक होते. आपण याबद्दल वारंवार, पुन्हा पुन्हा, इथे आराधनालयात चर्चा केली आहे.

मग आपण पाहतो की, या गोष्टींमुळे, प्रत्येक मतप्रणाली, मंडळी आणि संप्रदाय खूप मागे राहिले आहेत. तो शर्यतीतही नाही. प्रत्येक मतप्रणाली, प्रत्येक मंडळी, प्रत्येक संप्रदाय, पूर्णपणे बाजूला ठेवला जातो. तिथे त्यांच्यासाठी मुळीच जागा नाही.

39 जुन्या करारात, किंवा बायबलमध्ये कुठेही, मंडळीचा प्रकार दाखवलेला नाही, पण बाबेलच्या मनोऱ्याची जबरदस्तीची एकता. हीच एक गोष्ट आहे जी एकतेचे प्रतीक दाखवते. कारण, ते निम्रोदाद्वारे होते, एक दुष्ट मनुष्य ज्याने बाहेर जाऊन सर्व छोट्या देशांना जबरदस्तीने एकत्र आणले आणि या मोठ्या मनोऱ्याकडे आणले. ती एक धार्मिक उपासना होती, अर्थातच, परंतु परमेश्वराच्या वचनात त्याचा समावेश नाही. म्हणूनच जुन्या करारात, तुम्ही पाहता की संप्रदायिक धर्माचे प्रतीक, बाबेलचा मनोरा आहे. जो, हा धर्म नक्कीच एक धर्म होता, परंतु देवाच्या वचनाचा धर्म नव्हता.

40 देवाने त्याचे नाव कोणत्याही संप्रदायात ठेवण्यासाठी निवडलेले नाही. मला त्यासाठी वचनलेख हवे आहे, जर ते आहे. मला माहित आहे ते दावा करतात की त्याने ठेवले आहे, परंतु त्यानी ठेवले नाही. तो त्याचे नाव अनेक स्थानात ठेवू शकत नाही, कारण त्याने म्हटले आहे की त्याने त्याचे नाव एकाच स्थानात ठेवले आहे. आणि, ती एक जागा, आपल्या संप्रदायातील प्रत्येकाला सांगायचे आहे की ते स्थान तेच आहे, परंतु ते ह्याच्या विपरीत आहे.

परंतु त्याने त्याचे नाव कुठे ठेवले?

41 आता, आणि, तो, प्रथम, त्याचे नाव काय आहे? म्हणूनच, आपण (नाव) देवाचे नाव काय आहे हे शोधले पाहिजे, त्यानंतरच आपण पाहू शकतो की तो त्या ठिकाणी काय ठेवत आहे.

आता, आपण पाहतो की त्याला पुष्कळ शीर्षक होत्या. त्याला...त्याला "पिता" म्हटले आहे, जे एक शीर्षक आहे. आणि त्याला "पुत्र" म्हटले, जे एक शीर्षक आहे. त्याला "पवित्र आत्मा" म्हटले आहे, जे एक शीर्षक आहे. त्याला "शारोनचा गुलाब" म्हटले होते, जे एक शीर्षक आहे. "दरीतील लिली," एक शीर्षक, "प्रभात तारा." "यहोवा–

यिरे, यहोवा–राफा," सात वेगवेगळी, मिश्र, मुक्तीची नावे, आणि ते सर्व शीर्षके होती. त्यांच्यातील एकही नाव नव्हते.

परंतु त्याला एक नाव आहे.

42 जेव्हा तो मोशेला भेटला, त्याला अजूनही नाव नव्हते, आणि त्याने मोशेला सांगितले, "मी आहे जो मी आहे." आणि जेव्हा आपण येशूला पृथ्वीवर, इब्रीकरांस 6व्या अध्यायात बोलताना पाहतो...क्षमा करा, संत योहान 6वा अध्याय. तो म्हणाला, "मी आहे जो मी आहे."

त्यांनी म्हटले, "का, तू तर पन्नास वर्षांचा देखील नाहीस, आणि म्हणतोस की तू 'अब्राहामला पाहिलास'?"

43 त्याने म्हटले, "अब्राहामाच्या पूर्वी मी आहे." आणि "मी आहे," तोच, जळणारे झुडूप होता, तो अग्निस्तंभ जो मोशेच्या दिवसात जळत्या झुडूपात होता, "मी आहे जो मी आहे."

44 आणि आता आपण पाहतो की येशूने असेही म्हटले, "मी माझ्या पित्याच्या नावाने आलो, आणि तुम्ही मला स्वीकारले नाही." मग, पित्याचे नाव येशू असले पाहिजे. ते बरोबर आहे. पित्याचे नाव येशू आहे, कारण येशूने तसे म्हटले आहे. "मी माझ्या पित्याचे नाव धारण करतो. मी माझ्या पित्याच्या नावाने येतो, आणि तुम्ही मला स्वीकारले नाही." तेव्हा, त्याचे नाव येशू होते.

आणि गॅब्रिएलने त्याला येशू म्हटले, संदेष्ट्यांनी त्याला येशू म्हटले, आणि तो पूर्णपणे येशूच होता. त्याच्या जन्माआधी, पवित्र भविष्यवक्ताने ही त्याचे नाव *इम्मानुएल* म्हटले, ज्याचा अर्थ "परमेश्वर आमच्याबरोबर आहे." मग, "परमेश्वर देहात प्रगट झाला, ह्यासाठी की जगाचे पाप दूर करावे," आणि, असे करताना, त्याला येशू नाव दिले होते. म्हणून, येशू हेच नाव आहे.

आणि ते नाव मनुष्यामध्ये ठेवण्यात आले; मंडळी नाही, संप्रदाय नाही, मतप्रणाली नाही, परंतु एका मनुष्यात! त्याने येशू ख्रिस्तामध्ये त्याचे नाव ठेवण्यासाठी निवडले. आता आपण पाहीले की मग तो परमेश्वराचे आराधनाचे स्थान बनतो, जिथे तुम्ही त्याची आराधना करता.

45 त्याचा जन्म होण्याआधी, त्याचे नाव येशू ठेवले गेले होते. ते इतके महत्त्वाचे होते, की ते त्याच्या आईला गॅब्रिएल देवदूताने दिले होते, की त्याचे नाव "येशू, देवाचा पुत्र," असे म्हटले जाईल, जो तो होता.

46 तर मग, तेच आहे. फक्त हेच आहे. ते केवळ त्याच्यासाठीच आहे, परमेश्वराने निवडलेले आराधनाचे स्थान आहे. देवाचे स्थान, निवडलेले. देवाने मनुष्याला भेटण्याचे ठिकाण निवडले; ते मंडळीमध्ये नव्हते, संप्रदायात नव्हते, मतप्रणालीमध्ये नव्हते, तर ख्रिस्तामध्ये होते. तेच एक स्थान आहे जिथे परमेश्वर मनुष्याला भेटेल, आणि तो परमेश्वराची आराधना करु शकतो, जे ख्रिस्तामध्ये आहे. तीच एक जागा आहे. तुम्ही मेथोडिस्ट असाल, बॅप्टिस्ट, कॅथलिक, प्रोटेस्टंट, किंवा काहीही असाल, तिथे फक्त एकच स्थान आहे जिथे तुम्ही परमेश्वराची योग्यरितीने आराधना करु शकता, ती म्हणजे ख्रिस्तामध्ये.

रोमकरांस 8:1 मध्ये म्हटले आहे, "म्हणून आता ख्रिस्त येशूमध्ये असणाऱ्यांना दंडाज्ञा नाही, जे देहाप्रमाणे नाही, तर आत्म्याप्रमाणे चालतात." हेच सुसमाचार आहे.

47 आपण पंथानुसार वेगळे असू शकतो. आपण मानवनिर्मित सिध्दांतांवर वेगळे असू शकतो. तुम्ही मेथोडिस्ट मंडळीत गेलात तर तुम्हाला मेथोडिस्ट व्हावे लागेल; बॅप्टिस्टमध्ये गेलात तर बॅप्टिस्ट; कॅथलिकमध्ये गेलात तर कॅथलिक. पण जेव्हा तुम्ही ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेता, आणि त्याच्या देहाचे सदस्य होता, तेव्हा कोणतेही फरक राहत नाहीत. विभाजनाच्या मध्यल्या भिंती पाडल्या गेल्या आहेत आणि तुम्ही मुक्त आहात, कारण तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहात. आणि तुम्ही परमेश्वराची आराधना आत्म्याने आणि सत्याने करता जेव्हा तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहे. ही परमेश्वराची योजना आहे की तुम्ही त्याची आराधना ख्रिस्त येशूमध्ये करावी.

48 आता, कोणीही मंडळी संप्रदाय ह्यावर दावा करु शकत नाही, कोणीही तसा दावा करु शकत नाही. असे दावे करण्याची तुमची हिम्मत कशी झाली? असे करणे म्हणजे ख्रिस्तविरोधी आत्मा, जी ख्रिस्तापासून दूर नेते; त्याच्याकडून दूर करण्यासाठी. तुम्ही ते करु शकत नाही. ख्रिस्त हे एकमेव स्थान आहे जिथे परमेश्वर उपासकांना भेटतो.

49 ते म्हणतात, आज. असे लोक मला सांगण्यासाठी होते. काही काळापूर्वीच, टेक्सास, ब्यूमॉन्टमध्ये एका माणसाने मला फोन केला. तो म्हणाला, “श्री. ब्रॅन्हम, जर तुमचे नाव आमच्या मंडळीच्या पुस्तकात नसेल, तर तुम्ही स्वर्गात जाऊ शकत नाही.” तुम्ही कधी असा विचार कराल का? अशा गोष्टीवर विश्वास ठेवू नका. त्यांना वाटते की तुम्ही त्या विशिष्ट मंडळीचे असले पाहिजे नाहीतर तुम्ही स्वर्गात जाऊ शकत नाही. हे चुकीचे आहे. त्यावर विश्वास ठेवणे, म्हणजे ख्रिस्तविरोधी आहे. मी हे सांगतो: जर तुम्ही अशा आत्म्यावर विश्वास ठेवता, तर तुम्ही हरवलेले आहात. हे एक चांगले चिन्ह आहे की तुम्ही हरवले आहात, कारण ते देवाने केलेल्या गोष्टींपासून दूर करत आहे. देवाने त्याचे नाव कोणत्याही मंडळीत कधीच ठेवले नाही. त्याने ते त्याचा पुत्र, ख्रिस्त येशूमध्ये ठेवले, जेव्हा तो आणि त्याचा पुत्र एक झाले. तेच खरे आराधनाचे स्थान आहे. दुसरी कोणतीही पायाभरणी घातली गेली नाही, दुसरा कोणताही खडक नव्हता.

मी ख्रिस्तावर, जो भक्कम खडक आहे, उभा आहे;
इतर सर्व पाया ही बुडणारी वाळू आहे.

संप्रदाय तुटून पडतील, राष्ट्रे नष्ट होतील, परंतु तो सदैव कायम राहील. परमेश्वराची आराधना करण्यासाठी मनुष्याला दुसरीकडे कुठेही जागा मिळणार नाही, जिथे परमेश्वर त्याला प्रत्युत्तर देईल. अशी जागा फक्त ख्रिस्त येशूमध्येच आहे. ती एकच जागा आहे, तीच जागा जी परमेश्वराने त्याचे नाव ठेवण्यासाठी निवडली, आणि एकच जागा जिथे तो मनुष्यांना भेटतो, आराधना करण्यासाठी. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवणे, म्हणजे हरवणे आहे.

50 पाहा, सर्व सात यहुद्यांचे पर्व त्या एकाच जागी ठेवले जात होते. *इथे* मेथोडिस्टसाठी एक पर्व आणि *इथे* बॅप्टिस्टसाठी दुसरा असे कधीच ठेवले गेले नाही, *तिकडे* प्रेस्बिटेरियनसाठी एक, *इथे* कॅथलिकसाठी एक, आणि एक प्रोटेस्टंटसाठी. सर्व सात पर्व एकाच जागी ठेवल्या जात होत्या.

51 हे इथे एक खूप सुंदर प्रकार आहे. आपण नुकताच सात मंडळीच्या युगांचा अभ्यास केला आहे, हे दाखविण्यासाठी की देव सात मंडळीची युगे वचनात ठेवतो, कारण प्रत्येक मंडळी युगाने वचनाचा काही भाग उत्पन्न केला, आणि जेव्हा जेव्हा त्यांनी तो उत्पन्न केला आणि त्यांनी प्रकाश पाहिला.

अगदी त्या लोकांसारखे ज्यांनी येशूच्या नावात बाप्तिस्मा घेण्याचा पहिला शोध लावला. त्यांनी काय केले? त्यांनी त्यापासून संप्रदाय बनवली, आणि ते तिथेच मेले. मग

देव दुसऱ्या व्यक्तीकडे गेला. तो त्या मतप्रणालींमध्ये आणि सिद्धांतांमध्ये राहणार नाही. त्याचा त्याच्याशी काही संबंध नाही. देवाविषयी काही विकृत नाही. देवाचे वचन पवित्र, अशुद्धतारहित आहे. ख्रिस्त हा परमेश्वराचे आराधनाचा केंद्रस्थान आहे. तो परमेश्वर आहे.

52 सर्व सात पर्व एकाच ठिकाणी ठेवले पाहिजेत. तुम्ही पर्व दुसऱ्या ठिकाणी ठेवू शकत नाही. परंतु ते सात, स्थान...वर्षातील सात पर्व एकाच ठिकाणी ठेवले पाहिजेत. म्हणून, सात मंडळीची युगे एकाच ठिकाणाहून येणे आवश्यक होते, तो ख्रिस्त सर्व सात मंडळीच्या युगात बोलत होता. ते अगदी बरोबर आहे. सात मंडळीच्या युगांचा, प्रकार होता, पण त्यांनी त्यातून संप्रदाय निर्माण केले.

53 आता आपण इथे असताना दुसरा प्रकार पाहूया, तो वल्हांडणाचा प्रकार आहे, जो येशूला पूर्वछाया करतो. आपण इथे रक्ताचे बलिदान, मृत्यूद्वारे पाहतो. रक्ताचे बलिदान हे ते स्थान होते ज्याने ख्रिस्ताची पूर्वछाया केली. काय संप्रदाय रक्तस्त्राव करु शकतो; तुम्ही मंडळी रक्तस्त्राव करत आहे, संप्रदाय रक्तस्त्राव करते असे विचार करु शकता? नक्कीच नाही. रक्ताची गरज लागली, जीवनातून रक्त वाहण्यासाठी. आणि, ते जीवन, इथे येशू कोकऱ्याद्वारे दृश्यात येतो. कोकरा हा ख्रिस्ताचा एक प्रकार होता, आणि ख्रिस्ताची पूर्वछाया, कारण तो "परमेश्वराचा कोकरा" होता, ज्याचे परिचय योहानाने दिले, "जो जगाचे पाप दूर करतो." आपण इथे निर्गम 12व्या अध्यायात, येशूला दृश्य मध्ये पाहतो.

54 पाहा, हे एकच स्थान होता जिथे मृत्यू येऊ शकत नाही. जेव्हा मृत्यू भूमीवर येणार होता, तेव्हा एक विशिष्ट जागा असणे आवश्यक होते; त्या जागेच्या बाहेर असलेले सर्व नाश पावले. फक्त एकच स्थान! आता, त्याचा अर्थ असा नव्हता की ते एक घर होते; परंतु तेथे एक स्थान होता, जिथे कोकरा घात केला गेला. जिथे कोकऱ्याचे रक्त होते, तिथे मृत्युचा दूत प्रहार करु शकत नव्हता, कारण ती एकच जागा होती जिथे परमेश्वराने त्याचे नाव ठेवले होते. आणि त्या कोकऱ्याला तिथे सुरुवातीला नाव देण्यात आले, एक कोकरा. पाहा, हे एक स्थान होते जिथे तो प्रहार करु शकत नव्हता.

55 आणि आता आजही तसेच आहे. फक्त एकच स्थान आहे जिथे आत्मिक मृत्यू येऊ शकत नाही, ते म्हणजे वचन. मृत्यू वचनाला स्पर्श करू शकत नाही, कारण ते परमेश्वराचे जिवंत वचन आहे.

पण जेव्हा तुम्ही त्यात मतप्रणाली मिसळता, तेव्हा वचन स्वतःकडे परत जाते. ते तेलापासून पाण्यासारखे वेगळे होईल. तुम्ही ते एकत्र मिसळू शकत नाही. म्हणून, तुम्ही पाहा, जेव्हा मतप्रणाली संप्रदायात येते, ते सर्व मतप्रणालीच्या मागे जातात; आणि तिथे वचन मरतो, आणि दुसऱ्याबरोबर जातो आणि त्याची अधिक वाढ करते. ते गती घेऊ लागते, जसे ते नीतीमान ठरविण्यापासून, पवित्रकरणाकडे जाते, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्माकडे, आणि पुढे धान्यामध्ये! देवाने चाललेला मार्ग तुम्ही पाहता का? त्याचे नाव, सर्व समयी, अगदी त्याच प्रकारे आणत आहे, कारण तो वचन आहे.

पाहा, ते मरू शकत नाही. जीवनाचे वचन मरू शकत नाही.

56 आता, पाहा किती परिपूर्ण. मृत्युच्या दूताला मिसरच्या महान विद्वान लोकांना मारण्यास मनाई नव्हती. त्याच्या पवित्र भूमीवर, त्याच्या मोठ्या इमारतींवर, त्याच्या फारोला प्रहार करण्यास मनाई नव्हती. किंवा, देशाच्या याजक, देवदूताला प्रहार करण्यास मनाई नव्हती. तो कोणत्याही इमारतीवर, कोणत्याही जागेवर, कोणावरही प्रहार करू शकतो, पण जिथे कोकरा होता तिथे तो प्रहार करू शकत नाही.

जिथे परमेश्वराचे हे प्रदान केलेले स्थान आहे, आणि ते कोकऱ्यामध्ये आहे, तिथे मृत्यू येऊ शकत नाही.

57 पाहा…त्याने इस्त्राएल किंवा इब्री याजकांनाही मारण्यास मनाई केली नव्हती, आणि, किंवा त्यांच्या कोणत्याही संप्रदायाला. सर्वजण परमेश्वराच्या निवडलेल्या, प्रदान केलेल्या स्थानात, येणे आवश्यक आहे, नाहीतर मृत्यू त्यांच्यावर येते.

58 मंडळी, तुम्ही कुठेही असाल, तुम्ही कोणाशीही संबंधित असाल, त्याने मला काही फरक पडत नाही. परंतु, एक गोष्ट तुम्हाला माहीत असली पाहिजे, तुम्ही ख्रिस्तामध्ये असले पाहिजे नाहीतर तुम्ही मृत आहात. तुम्ही त्याच्या बाहेर राहून जगू शकत नाही. तुमची मंडळी इमारत म्हणून योग्य असू शकते; तुमची सहभागिता व्यक्ती म्हणून योग्य असू शकतो. पण जेव्हा तुम्ही शरीर, रक्त, येशू ख्रिस्ताचे वचन नाकारता, जेव्हा तुम्ही ते करता तेव्हा तुम्ही मरण पावता. ते परमेश्वराने निवडलेले आराधनाचे स्थान आहे. तिथेच त्याचे नाव आहे, अगदी बरोबर. तिथेच त्याने त्याचे नाव ठेवण्याची निवड केली; मंडळीत नाही, परंतु पुत्र, येशू ख्रिस्तामध्ये.

59 पाहा, सुरक्षितता केवळ त्याच्या निवडलेल्या स्थानात, त्याच्या कोकऱ्यामध्ये, आणि कोकऱ्याच्या नावामध्ये आहे.

60 पाहा, तो एक “नर” कोकरू होता, तो, ती नाही. मंडळी नाही; पण त्याचे नाव, तिचे नाव नाही. जिथे तो लोकांना भेटणार होता ते तिच्या नावाने नाही, परंतु त्याच्या नावात, त्याच्या, कोकऱ्यात!

61 आता आपण म्हणतो, “ती मंडळी, ती महान, सामर्थ्यशाली मंडळी, तिने *हे* केले आणि तिने *ते* केले. तिने वादळांचे वजन मापले आहे. आपण लोकसंख्येत वाढ केली आहे. आम्ही मोठ्या संख्यात आहोत. आम्ही सामर्थ्यशाली मंडळी आहोत. ती एक महान गोष्ट आहे.”

परंतु परमेश्वराने तिच्याविषयी कधीच काही सांगितले नाही. तो म्हणाला, “त्याला.” “तो,” भेटण्याचे स्थान आहे, कोकरा, मंडळी नाही. तिचे नाव नाही, परंतु त्याचे नाव. त्याने तिचे नाव कुठेही ठेवले नाही. त्याने त्याचे नाव “त्याच्या” मध्ये ठेवले!

हेच कारण आहे की, “आपण जे काही करतो, शब्दाने किंवा कृतीने, ते सर्व आपण सर्व येशू ख्रिस्ताच्या नावाने केले पाहिजे.” जर आपण प्रार्थना करतो, तर आपल्याला येशूच्या नावाने प्रार्थना केली पाहिजे. जर आपण विनंती केली, तर आपल्याला येशूच्या नावाने मागावी लागेल. जर आपण चालतो, आपण येशूच्या नावाने चालतो. जर आपण बोलतो, आपण येशूच्या नावाने बोलतो. जर आपण बाप्तिस्मा देतो, तर तो येशू ख्रिस्ताच्या नावानेच द्यायला हवा. कारण, “आपण जे काही वचनात किंवा कृतीत करतो, ते येशू ख्रिस्ताच्या नावाने करावे.”

62 एकदा एक व्यक्ती मला म्हणाला, त्यावर चर्चा करताना, तो म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम, माझी पत्नी, मी नाही…” तो म्हणाला, “ती, तिचे नाव *अमुक-अमुक* आहे.” तो एक सेवक आहे, कदाचित आता इथे बसला असेल. त्याने म्हटले, “माझी पत्नी,” असे म्हणाला, “तिच्याकडे माझे नाव आहे.” मी फक्त *जोन्स* म्हणतो, कारण ते जोन्स नव्हते. त्याने म्हटले, “आता, तिला रोज सकाळी उठून झाडू घ्यायची गरज नाही आणि म्हणायची गरज नाही, आता मी जोन्सच्या नावाने फरशी झाडते, आणि मी जोन्सच्या नावाने भांडी धुते, आणि आणि मी कपडे जोन्सच्या नावाने शिवते.’” तो म्हणाला, “मला वाटतं तुम्हाला काही नाव घेण्याची गरजच नाही.”

मी म्हणालो, “मला विश्वास आहे की तुम्ही करतात.” अगदी बरोबर.

आणि तो म्हणाला, “बरं, का? तिला हे बोलण्याची गरज नाही. ती जे काही करते ते सुरुवातीपासूनच जोन्सच्या नावाने करते.”

63 मी म्हणालो, “पण तुम्ही कधीच रस्त्यावर चालत जाऊन तिला आणली नाही, आणि म्हणालात नाही, ‘चल, जोन्स.’ तिला, प्रथम, एका समारंभाद्वारे, एका विवाह समारंभाद्वारे, ‘जोन्स’ बनावे लागले. जर तिने तसे केले नाही, तर तुम्ही व्यभिचारात राहत आहात. आणि जर तुमचा बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या नावाशिवाय दुसऱ्या प्रकारे झाला आहे, तर तो व्यभिचारी बाप्तिस्मा ठरतो, जे बायबलमध्ये नाही आहे.”

मग, “तुम्ही जे काही करता, शब्दाने किंवा कृतीने, ते सर्व येशूच्या नावाने करा.” त्यानंतर, तुम्ही काय करता! परंतु प्रथम, तुम्ही त्याच्या नावात बनले आहात.

64 या इमारतीत आज रात्री अनेक उत्तम स्त्रिया आहेत, उत्तम, निष्ठावान स्त्रिया; परंतु एक श्रीमती विलियम ब्रॅन्हम आहे. तीच माझ्याबरोबर घरी जाते. तीच माझी पत्नी आहे.

65 जगात चांगले लोक, चांगल्या मंडळ्या आहेत; परंतु एकच श्रीमती येशू ख्रिस्त आहे, आणि तिच्यासाठी तो येत आहे. तिथेच त्याचे नाव आहे. तिथेच त्याची आराधना आहे, फक्त तिच्यामध्ये आणि फक्त तिच्यातच. हे खरे आहे. ओह, होय, महाशय. आपण पाहतो ते खरे आहे.

66 आता, म्हणूनच, आपण, “आपण जे काही वचनात किंवा कृतीत करतो, ते आपण येशू ख्रिस्ताच्या नावाने करतो.”

“स्वर्गाखाली दुसरे नाव तारणासाठी दिलेले नाही, फक्त येशू ख्रिस्ताचे नाव दिले आहे.” प्रेषितांची कार्ये, 2रा अध्याय, असे म्हणते की, “हे लक्षात आणा…” “स्वर्गाखाली मनुष्यांमध्ये दुसरे कोणतेच नाव दिले नाही, ज्याद्वारे त्यांचे तारण व्हावे, फक्त येशू ख्रिस्ताच्या नावाने.” आमेन. मला आशा आहे की तुम्हाला ते समजते. येशू ख्रिस्ताचे नाव, प्रत्येक…

सर्वोच्च स्वर्ग त्याच्या नावाने ओळखला जातो, “स्वर्गातील संपूर्ण कुटुंब येशूच्या नावाने ओळखले जाते,” असे बायबल म्हणते, “आणि पृथ्वीवरील संपूर्ण कुटुंब येशूच्या नावाने ओळखले जाते.” तर हेच परमेश्वराचे निवडलेले नाव आहे आणि जिथे त्याने ते ठेवले आहे. ते त्याचे आराधनेचे स्थान आहे, ते येशू ख्रिस्तामध्ये आहे. आता, आपल्याला ठाऊक आहे की, त्याच्याशिवाय आराधनेसाठी दुसरे स्थान नाही.

67 “स्वर्गाखाली मनुष्यांमध्ये दुसरे कोणतेच नाव दिले नाही, ज्याद्वारे त्यांचे तारण व्हावे.” त्याचे नाव म्हणजे देवाचे मुक्तीचे नाव आहे. देवाला यहोवा-यिरे, यहोवा-राफा असे नाव आहे. *यहोवा-यिरे*, “प्रभू तुझ्या सर्व पापांची क्षमा करतो.” *यहोवा-राफा*, “प्रभू तुझे सर्व रोग बरे करतो.” त्याचे अनेक शीर्षक होते. परंतु त्याच्याकडे मुक्तीचे एकच नाव आहे, जो मनुष्य जातीचा आहे, आणि ते “येशू” चे नाव आहे. ते त्याचे नाव आहे, जे त्याने ठेवण्यासाठी निवडले. त्याने ते कुठे ठेवले? त्याने ते ख्रिस्तामध्ये ठेवले.

68 इतर सर्व मंडळीची नावे, पंथ, शिर्षके, त्यांच्यावर विश्वास ठेवणे मृत्यू आहे. जर तुम्ही मेथोडिस्ट मंडळीवर विश्वास ठेवत असाल की ते तुम्हाला स्वर्गात घेऊन जाईल, तर तुम्ही हरवलेले आहात. जर तुम्ही पेंटेकॉस्टलवर, पेंटेकॉस्टल मंडळी तुम्हाला स्वर्गात नेण्यासाठी विश्वास ठेवत असाल, तर तुम्ही हरवलेले आहात. आणि बॅप्टिस्ट, लूथरन, प्रेस्बिटेरियन, कॅथलिक, किंवा इतर कोणतीही मंडळी; तुम्ही त्यांच्या नावावर, किंवा त्यांच्या शीर्षक वर, किंवा त्यांच्या पंथावर विश्वास ठेवत असाल, तर तुम्ही हरवलेले आहात.

कारण, तुम्ही आराधना सुद्धा करु शकत नाही जोपर्यंत तुम्ही प्रथम आराधनेच्या स्थळात येत नाही. आमेन. हाच एक स्थान आहे जिथे परमेश्वर उपासकाशी भेटतो, तो म्हणजे ते स्थान जिथे त्याने आपले नाव ठेवण्याची निवड केली. इतर सर्व, जर तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवता, तुम्ही मराल. त्याने पण...

69 इथे येशूची आणखी एक छाया, मी चिन्हांकित केली आहे, शास्त्रलेख. तसेच, त्याने—त्याने इथे पूर्वछाया दर्शविली, "तो निर्दोष असावा." ज्या स्थानी तो त्याचे नाव ठेवतो, हा कोकरावर कोणताही दोष नसावा.

आता, तुम्ही ह्याला कोणत्या संप्रदाय किंवा प्रणालीशी जोडू शकता; कोणती मंडळी, कॅथलिक, प्रोटेस्टंट, यहुदी, ती जी काही आहे? कोणती प्रणाली, संप्रदाय, ज्याला तुम्ही "त्याच्यावर कोणताही दोष नसलेला" असे दर्शवू शकता? हे सर्व अस्वीकार झालेले आहे, आणि नाकारले गेले आहे!

परंतु तिथे एक स्थान आहे! हाल्लेलुया! ते स्थान येशू ख्रिस्तामध्ये आहे. त्याच्यावर एकही डाग नाही. त्याच्यात काहीही दोष नाही.

तुम्ही हे लादू करू शकत नाही. जे लोक असे करण्याचा प्रयत्न करतात, ते म्हणतात की त्यांची मंडळी निर्दोष आहे, आणि *असेच* बरेच काही. ते अशुद्ध आहे, वचन तोडणारे, भोगप्रिय, अर्धमृत, लाओदिकीय, मतप्रणाली; पण ते सत्य नाही. पण पिलात स्वतः, जो त्याचा शत्रू होता, म्हणाला, 'मला त्याच्यात काहीही दोष सापडत नाही." त्याच्या स्वतःच्या शत्रूने साक्ष दिली की त्याच्यामध्ये काही दोष नव्हता. तुम्ही त्याच्यावर कोणतेही पाप लादू शकत नाही.

70 तो त्याच्या दिवसांतील याजकांना म्हणाला, "तुमच्यापैकी कोण मला पापी म्हणून दोष लावू शकतो? कोण दाखवू शकतो की मी पापी आहे?"

मला एक मंडळी सांगा जी म्हणू शकेल की त्यांनी कधीच काही चुकीचे केले नाही. खरे सांगायचे तर, त्यांच्यातील एकही नाही, पण ज्याने खून केले आहे, आणि जे काही करायचे आहे ते सर्व केले आहे, जवळजवळ. मग तरीही त्यांना स्वतःला म्हणवतात... म्हणूनच कोणत्याही मतप्रणालीत किंवा पंथात, परमेश्वराचे आराधनेचे स्थान नाही.

71 माझ्या मित्रांनो, मला भावना दुखवायच्या नाहीत, परंतु मी या संदेशासाठी जबाबदार आहे, आणि, तो संदेश आहे, "ह्या गोंधळातून बाहेर या!" आणि जर मी तुम्हाला बाहेर येण्यास सांगितले, तर मी तुम्हाला कुठे घेऊन जाणार आहे? मी तुम्हाला ब्रॅन्हम टॅबरनॅकलमध्ये घेऊन जाईन का? त्यातही इतरांप्रमाणेच दोष आहेत.

परंतु एक स्थान आहे जिथे मी तुम्हाला घेऊन जाऊ शकतो, जिथे तुम्ही सुरक्षित आहात आणि मृत्यूपासून संरक्षित आहात, ते येशू ख्रिस्तामध्ये आहे, ते परमेश्वराचे आराधनेचे स्थान आहे. त्याच स्थानाचा मी तुम्हाला आज रात्री परिचय देत आहे, जिथे परमेश्वराने त्याचे नाव ठेवले आहे. जिथे त्याने अभिवचन दिले आहे की तो तिथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला भेटेल, तो त्याच्याबरोबर आराधना करील आणि त्याच्याबरोबर भोजन करील, जे ख्रिस्तामध्ये आहे; कोणत्याही मंडळीत नाही, किंवा आराधनालयात नाही.

परंतु, ख्रिस्तामध्ये, तो परमेश्वराचा आराधनालय आहे. तोच ते स्थान आहे ज्यात परमेश्वर स्वतः आला, आणि त्याच्यामध्ये वास केला. "हा माझा प्रिय पुत्र आहे, ज्यामध्ये मी राहण्यास संतुष्ट आहे." तिथेच परमेश्वराने वास केले, त्याचे नाव आणले आणि ते येशू ख्रिस्तावर ठेवले. म्हणूनच, त्याचे नाव एका मनुष्यामध्ये ठेवले गेले, त्याच्या पुत्रामध्ये, येशू ख्रिस्तामध्ये, ज्यामध्ये त्याने स्वतः वास केला, आणि त्या आराधनालयात.

जिथे, एका प्रतिरूपात, जुने यरुशलेम, जुने पर्व, जुने मंदिर, हे प्रतिरूप होते; जेव्हा धूर आत आला, त्या दिवशी जेव्हा कराराचा कोश आत गेला, आणि स्थिर झाला, आणि त्यांतून परमेश्वराचा आवाज ऐकू आला.

तशाचप्रकारे परमेश्वराचा आवाज ऐकू आला, मंदिरात येताना, येशू ख्रिस्तामध्ये, ज्याचे, जुने (स्वाभाविक) हे नवीनाचे प्रतिरूप आणि छाया होती. आणि जेव्हा तो ख्रिस्तामध्ये आला, तो म्हणाला, "हा माझा प्रिय पुत्र आहे, ज्याच्यामध्ये राहण्यास मी संतुष्ट आहे. आणि मी ते स्थान निवडीन जिथे मी माझे नाव ठेवीन, आणि जिथे मी मनुष्यांना भेटेन, आणि जिथे माझी आराधना होईल." परमेश्वराने ती जागा निवडली; कोणत्याही मंडळीच्या संप्रदायामध्ये नाही, परंतु येशू ख्रिस्तामध्ये. होय, महाशय.

72 त्याला देखील "निर्दोष" असले पाहिजे, जसे मी म्हटले. कोणताही संप्रदाय ते दावा करू शकत नाहीत. ते करतात; ते ख्रिस्तविरोधी आहेत.

73 आता आपण इथे पाहतो, त्याच्या सावलीकडे पुन्हा पाहा. त्या—त्या कोकऱ्याला ठेवले पाहिजे. आता, हे निर्गम 12 मध्ये आढळते, जर तुम्ही त्यावर खूण करीत असाल, निर्गम 12:3 ते 6. कोकरू चार दिवस ठेवला पाहिजे, त्याची परीक्षा घेण्यासाठी, तो बलिदानासाठी योग्य आहे का हे पाहण्यासाठी. कोकरू चार दिवसांसाठी घेतला पाहिजे, पुन्हा पुन्हा तपासला पाहिजे, त्याच्यावर काही दोष आहे का हे पाहण्यासाठी, पाहायला की त्यामध्ये काही आजार आहे का, पाहायला की कोकऱ्यामध्ये काही चुकीचे आहे का. ते चार दिवस वेगळे ठेवले पाहिजे.

74 आता लक्ष द्या. तुमच्यातील काहींना वाटले असेल की ते थोडेसे होते, चौदाव्या दिवशी मारले गेले. परंतु, तुम्हाला लक्षात आहे, त्यांनी ते कोकरू त्या महिन्याच्या दहाव्या दिवशी घेतले, आणि महिन्याच्या चौदाव्या दिवशी मारले, पाहा, जे चार दिवस ठेवले होते.

75 आता, येशू, देवाचे नाव, कोकरा, यरुशलेम मध्ये गेला आणि तो पुन्हा बाहेर आला नाही, जोपर्यंत त्याचे मृत्यू, दफन आणि पुनरुत्थान झाले नाही. तो चार दिवस आणि चार रात्र टीकाकारांच्या अधीन ठेवला गेला. कोकराचे प्रतिरूप किती परिपूर्ण होते, चार दिवस वेगळे ठेवले गेले. तेव्हाच पिलात म्हणाला, "मला त्याच्यात काही दोष सापडत नाही."

76 त्याची आणखी एक छाया, त्याचे एकही हाड मोडले जाऊ शकत नव्हते, जे परिपूर्ण होते, जेव्हा ते करु शकले नाही. बलिदानाचा वध करताना, ते हाड मोडू शकले नाहीत. जर ते मोडले असते, तर ते नाकारले गेले असते. आणि त्यांनी आधीच हातोडा मागे ओढला होता, ख्रिस्ताच्या पायातील हाडे तोडण्यासाठी, तेव्हा त्यांनी म्हटले, "तो आधीच मेला आहे." त्यांनी त्याच्या बाजूला खुपसला आणि रक्त व पाणी बाहेर आले.

77 इथे आणखी एका महान गोष्टीकडे पुन्हा लक्ष द्या. मी ते टाळणार नाही, कारण तो अर्पणात, अन्नार्पणात दर्शविला गेला होता.

मला आठवते की एकदा त्यांची एक शाळा होती, बायबलमध्ये, ज्याला संदेष्ट्यांची शाळा म्हटले आहे, आणि ती खरोखर एक शाळा होती. आणि आपल्याला कळते की एलीया एके दिवशी त्या शाळेत गेला, आणि त्यांनी म्हटले, "आम्ही..." त्यांनी त्याला निघून जाण्याची विनंती केली आणि म्हणाले, "जेव्हा तू इथे असतोस, तेव्हा गोष्टी खूप सरळ होतात." म्हणून तो दूर जाण्याची त्यांची इच्छा होती.

आणि ते त्याला जेवण देण्यासाठी बाहेर गेले. आणि याजकांचा समुह, किंवा संदेष्टे, त्याच्यासाठी जेवण बनवण्याकरिता, वाटाणे आणण्यासाठी बाहेर गेला. आणि जेव्हा त्यांनी असे केले, त्यांनी त्यांच्यातील एक मोठा पोशाख गोळा केला; आणि जेव्हा ते परत आले,

त्यांचाकडे जंगली लवके होते, जे विष होते, आणि त्यांनी ते भांड्यात टाकले. आणि भांडी उकळू लागली, आणि त्यांनी, कोणीतरी, म्हणाले, “ओह देवा, त्या भांड्यात मृत्यू आहे. आता आपण जेवू शकत नाही.”

आणि एलीया म्हणाला, “माझ्यासाठी मूठभर जेवण आण.” आणि त्याने जेवण घेतले आणि भांड्यात टाकले, आणि म्हणाला, “खा. ते भांडे बरे झाले आहे.”

78 अन्न अर्पण हे ख्रिस्त होता. प्रत्येक दगडी पाटी सारखीच बसवली पाहिजे, आणि प्रत्येक लहानसा कण अन्न अर्पणासाठी सारखाच दळला पाहिजे. तोच आरोग्य देणारा आहे हे दाखवत आहे. तो मृत्यूची जागा घेतो, आणि जीवन देतो; दोन नियमांद्वारे. हाल्लेलुया! जिथे एका ठिकाणी, मृत्यू आहे; जेव्हा ख्रिस्त आत येतो, जीवन आत येतो. तो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे. आणि जिथे मृत्यू होता, तिथे जीवन झाले, कारण ख्रिस्ताला आत आणले होते, एक अन्न अर्पण.

79 काय महान धडे असतील हे, जर आपण वेळ काढून त्यांना समजून पाहिले तर! आता पाहा, छायेचा एकही शब्द चुकत नाही. छायेचा एकही शब्द कधीही चुकला नाही. सर्व काही अगदी परिपूर्णपणे जुळले.

तो परमेश्वराचे निवडलेले आराधनेचे स्थान आहे, आणि परमेश्वराचे नाव त्याला दिले गेले आहे. तो परमेश्वराचे निवडलेले आराधनेचे स्थान आहे, आणि परमेश्वराचे नाव त्याला दिले गेले आहे. तो परमेश्वराचे वचन आहे, आणि तो परमेश्वराचे नाव आहे. तो परमेश्वराचे वचन आणि परमेश्वराचे नाव दोन्ही आहे. “तो देहधारी झालेला वचन होता.” तो परमेश्वराचे वचन होता, परमेश्वराचा कोकरा, परमेश्वराचे नाव, आणि परमेश्वर होता. तोच तो होता, परमेश्वरासाठी निवडलेला आणि एकमेव आराधनेचे स्थान.

80 आणि परमेश्वर येशू ख्रिस्ताशिवाय दुसरीकडे स्थान स्वीकारत नाही; तुम्ही त्याची आराधना कुठेही करू शकत नाही. त्याने म्हटले, “आणि ते माणसाचे नियम आपली धर्मतत्वे म्हणून शिकवतात आणि ते व्यर्थच माझी उपासना करतात.” आज आपल्याकडे पंथ, मतप्रणाली, आणि सर्व गोष्टी आहेत, ज्या शिकवतात *हाच* मार्ग आहे आणि *तोच* मार्ग आहे.

आणि येशू म्हणाला, “मी मार्ग, सत्य आणि जीवन आहे; आणि माझ्याशिवाय कोणीही देवाकडे येऊ शकत नाही.” दुसऱ्या शब्दांत, “मी मेंढ्यांच्या कुंपणाचा दरवाजा आहे. जे बाहेर आहेत ते सर्व चोर आहेत.” तोच एकमेव मार्ग आहे. तो दरवाजा आहे. तोच मार्ग, सत्य, जीवन आहे, जे काही आहे ते सर्व; एकमेव प्रवेशद्वार, एकमेव स्थान, एकमेव उपासना, एकमेव नाव.

सर्व काही येशू ख्रिस्ताशी जुडलेले आहे. सर्व जुना करार त्याच्याशी जोडलेला आहे. नविन करार त्याच्याशी जोडलेला आहे. आणि आज मंडळी त्याच्याशी जोडली गेली आहे, त्याच्या आज्ञेच्या वचनाद्वारे. तिथे दुसरी जागा, किंवा दुसरे नाव, किंवा कुठेही नाही, जिथे देवाने मनुष्याला भेटण्याचे अभिवचन दिले आहे; फक्त येशू ख्रिस्तामध्ये, त्याचे निवडलेले आराधनेचे स्थान.

81 पाहा, परमेश्वराने त्याच्या उपासकांना केवळ ह्याच ठिकाणी भेटण्याचे अभिवचन दिले आहे, आणि ते त्याच्या स्वतःच्या निवडीचे आहे; आपल्या निवडीने नाही, आपल्या विचाराने नाही; तर त्याच्या विचाराने, त्याच्या निवडीने. आणि तेच ते स्थान असेल जिथे त्याने आपले नाव ठेवले, जिथे त्याने निवड केली. म्हणून आपण पाहतो की त्याने जिथे आपले नाव कुठे ठेवले, त्याने काय निवड केली, त्याच्या स्वतःच्या निवडीद्वारे.

82 आता जेव्हा आपण ते स्थान पाहिले आहे जिथे त्याने आपले नाव ठेवले, ते म्हणजे, ख्रिस्त येशूमध्ये, आणि अजून दुसरे स्थान नाही, किंवा दुसरे कोणतेही नाव नाही, तुम्ही त्याविषयी समाधानी आहात काय? म्हणा, "आमेन." [सभेचे लोक म्हणतात, "आमेन."—सम्पा.] आता, गोष्ट अशी आहे की, आपण पाहिले की ते स्थान कुठे आहे... आराधनेचे स्थान कुठेही स्वीकारले जात नाही, फक्त ख्रिस्तामध्येच.

तुम्ही पश्चाताप करु शकता, तुम्ही ते करु शकता, परंतु अजून तुम्ही आराधना करत नाही. तुम्ही क्षमा मागत आहात. पेत्र म्हणाला...

पेंटेकॉस्टच्या दिवशी, जेव्हा त्यांनी ते सर्व अनन्य भाषेत बोलताना, आणि मोठी चिन्हे आणि आश्चर्यकर्म घडताना पाहिले, ते हसू लागले, मंडळीने तसे केले, आणि म्हटले, "हे लोक नवीन द्राक्षारसाने भरलेले आहेत. हे लोक नशेत असल्यासारखे वागतात. ते..." मरियम कुमारी, आणि बाकी सर्वजण, असे एकशे वीस जण एकत्र होते. ते नशेतल्या लोकांसारखे डगमगत चालत होते, आणि अनन्य भाषेत बोलत होते, आणि असेच पुढे जात होते. ते म्हणाले, "हे लोक नविन द्राक्षारसाने भरलेले आहेत."

83 परंतु पेत्र, उभा राहून म्हणाला, "बंधुजनहो, ही माणसे नविन द्राक्षारसाने भरलेली नाहीत, कारण हा दिवसाचा फक्त तिसरा तास आहे. परंतु हे ते आहे ज्याविषयी योएल संदेष्ट्याद्वारे म्हटले होते, 'आणि शेवटल्या दिवसांत असे होईल, परमेश्वर म्हणतो, मी माझा आत्मा सर्व देहावर ओतीन; तुमचे पुत्र आणि कन्या भविष्यवाणी करतील; माझ्या दासींवर आणि सेविकांवर मी माझा आत्मा ओतीन. मी वर आकाशात, आणि पृथ्वीवर चिन्हे; अग्नी, अग्निस्तंभ, धुम्ररूप वाफ दाखवीन. परमेश्वराचा महान आणि भयंकर दिवस येण्यापूर्वी, असे होईल की, की जो कोणी प्रभूच्या नावाने त्याचा धावा करील त्याचे तारण होईल."

84 हे ऐकून, त्यांचे अंतःकरण खिन्न झाले, आणि म्हटले, "बंधुजनहो, आम्ही काय करावे?"

85 पेत्राने म्हटले, "पश्चाताप करा, आणि तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या की तुमच्या पापांची क्षमा व्हावी, म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल. कारण ही प्रतिज्ञा आहे की सर्व येणारे पिढ्या." आता आपण इथे पाहतो की.

86 आता आपल्याला पाहायचे आहे की आपण त्याच्या *मध्ये* कसे जातो. आपण ह्या आराधनाच्या स्थानात कसे जाऊ शकतो? पहिले करिंथकरांस पत्र 12 ते साध्य करतो, कारण, "एका आत्म्याद्वारे!" एका मंडळीद्वारे नाही, एका पंथाद्वारे नाही, एका पाळकाद्वारे नाही, एका बिशपद्वारे नाही, एका धर्मगुरुद्वारे नाही. परंतु, "एका पवित्र आत्म्याद्वारे आपण सर्वांचा बाप्तिस्मा एका शरीरात झाला आहे," जे येशू ख्रिस्ताचे शरीर आहे, आणि प्रत्येक दानाच्या अधीन जे त्या शरीरात आहे. होय, महाशय! ना सामील होणे, ना श्रद्धाघोषणा म्हणणे, ना उत्साह निर्माण करणे, निराश होणे, ना हस्तांदोलन करणे, आणि काहीही नाही. परंतु, जन्माद्वारे आपला बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या शरीरात झाला आहे! आमेन. "एका पवित्र आत्म्याने आपला सर्वांचा बाप्तिस्मा एका शरीरात झाला आहे."

87 आणि ते शरीर काय आहे? "प्रारंभी वचन होता, आणि वचन परमेश्वराबरोबर होता, आणि वचन परमेश्वर होता. आणि वचन देहधारी झाला आणि आमच्यात वस्ती केली." आपण त्या देहात असताना त्यातील एका वचनालाही नाकारणे, किंवा त्याला कुठेतरी दुसरीकडे ठेवणे जिथे तो देहातच नाही हे कसे शक्य आहे? आपण ते कधीही कसे करु शकतो? परमेश्वराने निवडलेले स्थान!

88 पाहा, आणि जेव्हा तुमचा बाप्तिस्मा त्याच्यात होतो, खरे प्रमाण हे आहे की तुम्ही त्याच्यावर, वचनावर विश्वास ठेवता.

तुम्ही त्याचा भाग असताना त्याला नाकारणे कसे शक्य आहे? मी माझा हात माझा हात नाही असे कसे म्हणू शकतो? जर तसे असेल...जर मी तसे केले, तर माझ्या मनात काहीतरी बरोबर नाही. आणि मी कसे करु शकतो? जर माझ्यात मानसिकरितीने काहीतरी चुकीचे आहे, नाकारतो की तो माझा हात आहे, नाकारतो की तो माझा पाय आहे, जे कधीही देवाने म्हटलेले आणि वचन दिलेले कोणतेही शब्द नाकारतो, तर त्या विश्वासी बरोबर काहीतरी आत्मिक चूक आहे. त्या तथाकथित विश्वासी मध्ये काहीतरी आत्मिक चूक आहे.

89 तुम्ही त्याचे एक अक्षरही नाकारू शकत नाही, कारण तुम्ही त्याचे भाग झाला आहात. तुम्ही त्याचे भाग आहात कारण तुम्ही त्याच्यात बाप्तिस्मा घेतला आहे; पवित्र आत्म्याने तुम्हाला येशू ख्रिस्ताच्या शरीरात आणले आहे, या द्वारे. किती सुंदर गोष्ट आहे!

90 देवाचे एक विशिष्ट स्थान होते जिथे तो भेटला—तो अब्राहामाला भेटला, आणि तिथे अब्राहामाने उपासना केली. संपूर्ण कराराभर!

आणि त्याच्या अभिवचन दिलेल्या वचनाचा अर्थ त्याच्याद्वारे, तुमच्च्यामध्ये लावला जाईल. तुम्हाला ते समजले का? वचन जे त्याने पूर्ण करण्याचे अभिवचन दिले आहे त्या दिवसात ज्यात तुम्ही राहत आहात: तुम्ही परमेश्वराचे लिखित पत्र व्हाल, जे सर्व लोक वाचतील. तुम्ही जे दावा करता ते नाही, परंतु परमेश्वर जे तुमच्याद्वारे करतो, ते तुम्ही जे काही दावा करु शकता त्यापेक्षा मोठ्याने बोलेल. परमेश्वर म्हणतो, "विश्वास ठेवणाऱ्यांबरोबर ही चिन्हे राहतील." ते तुमच्याद्वारे बोलते.

91 त्याने या युगाबद्दल सांगितले, की आता काय होईल. या युगातील विश्वासणाऱ्यांनी आज त्याने दिलेल्या वचनावर विश्वास ठेवला पाहिजे. जसे त्यांना वाचण्यासाठी, जहाजात यावे लागले; वाचण्यासाठी मिसरमधून बाहेर पडावे लागले; त्यांना ख्रिस्तामध्ये यावे लागेल, आता तारण होण्यासाठी, वचन संदेशामध्ये, की तो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे.

92 तुम्ही त्यात कसे येतात? बाप्तिस्म्याद्वारे! बाप्तिस्मा कशाचा, पाण्याचा? पवित्र आत्म्याद्वारे! "एका आत्म्याने, आपण सर्वांचा बाप्तिस्मा या एका शरीरात झाला आहे."

93 आणि त्याचे वचन, तो कधीही...तुम्हाला त्याचा अर्थ लावावा लागणार नाही. तो तुमच्याद्वारे त्याचा अनुवाद करील; तुम्ही काय करत आहात, त्याने जे करण्याचे वचन दिले आहे. त्याच्या मागे जाणारी मंडळी इतकी त्याच्यासारखी होतील की लोकांना कळेल.

पेत्र आणि योहानाकडे पाहा जेव्हा त्यांना सुंदर नावाच्या फाटकात एका मनुष्याला बरे करण्याविषयी प्रश्न विचारण्यात आले. ते म्हणाले, 'त्यांनी जाणले,' त्या याजकांनी, 'की ते दोघेही अज्ञानी आणि अशिक्षित पुरुष होते," पण त्यांनी लक्ष दिले की ते येशूबरोबर होते. कारण, (काय?) ते त्याने केलेल्या गोष्टी करत होते.

94 त्याला पित्याच्या कामात असलेच पाहिजे. आणि आजही ते तसेच असले पाहिजे.

95 आता, लक्षात ठेवा, तो काल, आज आणि युगानुयुग एकच आहे; कारण परमेश्वर तुम्हाला त्याच्यामध्ये भेटतो, तिथे एकच स्थान आहे; कारण तिथेच त्याने त्याचे नाव येशूमध्ये ठेवण्यासाठी निवडले आहे. "येशू" हे परमेश्वराचे नाव आहे. लक्षात ठेवा, पिता, पुत्र, पवित्र आत्मा ही नावे "येशू ख्रिस्त" या नावाचे शीर्षक आहेत.

96 जेव्हा मत्तय म्हणाला, “म्हणून तुम्ही जा आणि राष्ट्रांतील लोकास माझे शिष्य करा, पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावाने बाप्तिस्मा द्या.”

आज त्याचा कसा चुकीचा अर्थ लावला जातो, आणि म्हणतात, “पित्याच्या नावाने, पुत्राच्या नावाने, पवित्र आत्म्याच्या नावाने.” ते लिहीलेले ही नाही. हे, “नावाने,” एकवचन आहे, “पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या.” *पिता* हे नाव नाही, *पुत्र* हे नाव नाही, *पवित्र आत्मा* हे नाव नाही; ते एक शीर्षक आहे.

दहा दिवसांनंतर, पेत्र उभा राहिला आणि म्हणाला, “तुम्ही प्रत्येकजण पश्चाताप करा आणि येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या.” मग त्याने जे करण्यास सांगितले नाही ते केले का? त्याने जे करण्यास सांगितले तेच केले. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांचे नाव “प्रभू येशू ख्रिस्त” आहे. नवीन करारातील प्रत्येक व्यक्तीचा बाप्तिस्मा प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात झाला.

97 बायबलमधील एकाही व्यक्तीचा बाप्तिस्मा पिता, पुत्र, पवित्र आत्मा ह्या पदव्यांने झाला नाही. ते कधीच अस्तित्वात आले नाही जोपर्यंत नायसिया, इथे नायसिया धर्मघोषणा लागू करण्यात आली नाही, रोममध्ये. हे कॅथलिक मंडळीचे आदेश होते, ज्यात तेच सिद्ध केले गेले, धर्मशिक्षण मध्ये. मला समजले, बरोबर आहे, *आमच्या विश्वासाचे तथ्य,* व इतर, की ते पूर्णपणे रोमन कॅथलिक धर्मघोषणा आहे. ते तुम्हाला सांगतील ते बायबलमध्ये नाही; परंतु ते म्हणतात की त्यांच्याकडे ते शब्द बदलण्याचे अधिकार आहे, जर त्यांची इच्छा असेल तर, पोपमुळे. मी वेगळा आहे.

येशू ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे. “आणि जो कोणी ह्या बायबलमधून एक वचन काढील,” येशूने म्हटले, “किंवा त्यात एक शब्द जोडील, त्याचा भाग जीवनाच्या पुस्तकातून काढला जाईल.” एक शब्द; एक वाक्य, किंवा परिच्छेद नाही, परंतु शब्द! “जो कोणी एक शब्द घेईल…”

98 सुरुवातीला, देवाने त्याच्या लोकांना त्याच्या वचनाद्वारे सुरक्षित केले. एका शब्दाचा, चुकीचा अर्थ लावल्यामुळे प्रत्येक मृत्यू, प्रत्येक वेदना, प्रत्येक दु:ख झाले. हव्वेने कधीच एकही वाक्य मोडले नाही; तिने एक शब्द मोडला. जेव्हा येशू पुस्तकाच्या मध्यभागी आला…ते पुस्तकातील पहिले होते.

जेव्हा येशू पुस्तकाच्या मध्यभागी आला, त्याने काय म्हटले? “असे लिहीले आहे की मनुष्य फक्त भाकरीने जगणार नाही, परंतु देवाच्या मुखांतून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल.”

शेवटच्या पुस्तकात, प्रकटीकरण 22 वा अध्याय, 18वे वचन, बायबलचा शेवटचा भाग, येशू स्वतः बोलतो, म्हणाला, “मी साक्ष देतो की जर कोणी मनुष्य ह्या पुस्तकातून एक शब्द काढील किंवा त्यात एक शब्द जोडील, त्याचा भाग जीवनाच्या पुस्तकातून काढला जाईल,” कारण तो खोटा संदेष्टा आहे आणि त्याने लोकांना चुकीचे अर्थ सांगितले आहे, आणि त्यांच्या रक्ताची जबाबदारी त्याच्या हातावर येईल, असे केल्यामुळे.

99 आपण आराधनेचे ते एक स्थान ठेवले पाहिजे, ते म्हणजे येशू ख्रिस्त तो वचन आहे, जे काल, आज आणि सदासर्वकाळ सारखेच आहे. आमेन. ठीक आहे. लक्षात ठेवा, आराधनेसाठी दुसरे कोणतेही भेटण्याचे स्थान नाही, जागा नाही. देवाने ते निवडले.

100 योहान, खूप आधी, जुन्या आणि नवीन कराराच्या दरम्यानच्या मधल्या काळात. आता लक्षपूर्वक ऐका. बारकाईने लक्ष द्या. योहान, तो महान गरुड, एके दिवशी जंगलातून उडत आला, त्याची महान पंखे पसरलेली होती. तो यार्देनेच्या काठावर उतरला, एक

महान गरुड संदेष्टा, ज्याने जुना आणि नविन करार यांच्यामध्ये मार्ग पूल केला, आणि त्याने त्यांना उजवीकडून आणि डावीकडून बोलावले. तो पश्चातापाचा दिवस बोलावत होता.

जिथे फरीशी आणि सदुकी आले; तो म्हणाला, “तुम्ही असे म्हणू नका की, ‘अब्राहाम आमचा पिता आहे,’ कारण मी तुम्हाला सांगतो की परमेश्वर ह्या दगडांपासून अब्राहामासाठी मुले उभे करू शकतो.” ओह, माझ्या देवा!

जेव्हा त्याने आपले सुसमाचार सांगण्यास सुरुवात केली, आणि म्हणू लागला, “तुमच्या मध्ये एक उभा आहे, ज्याला तुम्ही ओळखत नाही. मी अजून त्याला ओळखले नाही, परंतु मी त्याला ओळखीन जेव्हा तो येईल. मी त्याचे बुटांचे बंद सोडण्यास ही पात्र नाही. परंतु तो तुम्हाला बाप्तिस्मा पवित्र आत्मा आणि अग्नीने देईल. आणि त्याचे सूप त्याच्या हातात आहे; त्याचे खळे अगदी स्वच्छ करील, आणि तो भूसा न विझणाऱ्या अग्नीत जाळून टाकील.”

101 तो महान सुसामाचाराचा गरुड तिथे बसला होता, आणि त्याने आपले मोठे इशारे जोरात दिले, आणि फिलिप बाहेर आला, किंवा त्या काळातील सम्राट हेरोद, घोषणा करणारा, ज्याने त्याचा भावाची पत्नीशी विवाह केला. आणि तुम्ही कल्पना करू शकता की तो मोठा सुवार्तेचा गरुड तिथे बसलेला आहे आणि तिथे शांत राहतो?

त्यांच्यातील काहीजण म्हणाले, “योहान, तू आता लग्न आणि घटस्फोटाचा प्रचार करु नकोस, कारण तिथे हेरोद बसला आहे.”

102 तो सरळ त्याच्या समोर चालून आला आणि म्हणाला, “तिला ठेवणे तुला कायदेशीर नाही.” बरोबर आहे!

काय, तो, तसा होता? तो रानातून आलेला गरुड होता. तो मनुष्याच्या भीतीने आणि धमक्यांखाली प्रशिक्षित झाला नव्हता, कुठच्या संप्रदायाच्या. पण तो सर्वशक्तिमान देवाच्या सामर्थ्याखाली प्रशिक्षित झाला होता, की त्याला काय असेल हे कळेल. त्याला मशीहाची ओळख माहिति होती.

हाल्लेलुया! ह्या शब्दाचा अर्थ, “आमच्या परमेश्वराची स्तुती करा!” घाबरू नका. मी अजूनपर्यंत कोणालाही दुखावले नाही. मला उत्साह वाटत नाही. मला ठाऊक आहे मी कुठे आहे.

ओह, जेव्हा मी त्याचा विचार करतो, तो मोठा गरुड तिथे उडत जातो आणि खाली बसतो! त्याने म्हटले, “तो आला की मी त्याला ओळखेन.”

103 एके दिवशी तो तिथे उभा राहून प्रचार करत होता. याजक दुसऱ्या बाजूला होते, म्हणाला, “तुला असे म्हणायचे आहे की अशी वेळ येईल की दररोजचे अर्पण काढून घेतले जाईल; हे महान मंदिर जे आम्ही बांधले आहे, आणि सर्व काम जे आम्ही केले आहे, आमच्या मोठ्या संप्रदायासाठी?”

तो म्हणाला, “एक वेळ अशी येईल जेव्हा ते सर्व नष्ट केले जाईल.”

“ते असू शकत नाही. तू खोटा संदेष्टा आहेस!”

104 आणि त्याने सभोवती पाहिले. तो म्हणाला, “पाहा, तिथे तो आहे! तिथे परमेश्वराचे निवडलेले आराधनेचे स्थान आहे. तिथे तो कोकरा आहे, तो खरा कोकरा आहे जो जगाचे पाप दूर करतो.” त्याने असे म्हटले नाही, “इथे मेथडिस्ट येतो, इथे बॅप्टिस्ट येतो, किंवा कॅथलिक येतो.” तो म्हणाला, “तिथे देवाचा कोकरा येतो जो जगाचे पाप दूर करतो.”

फक्त एकच सुरक्षितता क्षेत्र देवाच्या त्या कोकऱ्यामध्ये आहे. केवळ त्याचात तारण आहे; कोणत्याही मंडळीत, कोणत्याही पंथात, कोणत्याही लोकांमध्ये, कोणत्याही पिता, कोणत्याही आईमध्ये नाही, कोणताही पवित्र मनुष्य, किंवा काहीच नाही, पवित्र स्थान नाही. ते पवित्र परमेश्वर, प्रभू येशू ख्रिस्तामध्ये आहे, जिथे परमेश्वराने त्याचे नाव मनुष्यावर, मुक्तीसाठी ठेवले, ज्याने आम्हा पाप्यांसाठी किंमत दिली. तोच एक स्थान आहे जिथे तारण आहे. तोच तो खडक आहे ज्यावर मी उभा आहे.

105 योहानाने त्याला ओळखले. तो म्हणाला, “मी त्याला ओळखले नाही जेव्हा मी त्याला चालत येताना पाहिले, परंतु जिथे माझे शिक्षण झाले...” त्याच्या वडिलांनी केले तसे धर्मशाळेत नाही; याजक म्हणून प्रशिक्षित नाही. पण रानात, जिथे तो सर्वशक्तिमान देवाच्या दैवीज्ञानाच्या शाळेत होता, देवाचे वचन येण्याची वाट पाहत होता; ते नाही जे काही मनुष्यांच्या समुहाने केले होते, परंतु देव त्याविषयी काय म्हणाला होता ते. आणि जेव्हा योहानाने वर पाहिले आणि आत्मा येताना पाहिला, तो म्हणाला, “मी साक्ष देतो, हा तो आहे.” ओह, माझ्या देवा!

तिथे तुमचे आराधना स्थळ आहे. तिथे तुमचे गुपित स्थान आहे. तिथे तो परमेश्वराचा कोकरा आहे जो जगाचे पाप दूर करतो. कोणतीही मंडळी नाही, पंथ नाही, किंवा दुसरे काहीच नाही, फक्त परमेश्वराचा कोकरा जो जगाचे पाप दूर करतो.

106 पाहा, योहानने ते कसे मांडले? त्याने असं म्हटलं नाही, “तुम्ही फरीशी योग्य आहात, तुम्ही सदुकी, हेरोदिनो.” तो म्हणाला, “तिथे तो कोकरा आहे.” तोच तो स्थान आहे. त्याचा नाव आहे. तोच एक आहे. स्वर्गाखाली दुसरे नाव नाही!

107 आता येशूने योहानाबद्दल काय म्हटले ते पाहा. एके दिवशी योहानाने त्याच्याकडे पाठविले, की तो काय करीत आहे हे पाहावे. येशूने त्याच्याविषयी म्हटले, “तो महान आणि चमकणारा प्रकाश होता,” त्यांना योग्य मार्ग दाखवावा जो त्यांनी त्याच्या आगमनाअगोदर अनुसरला पाहीजे, त्याचे पहिले आगमन. लक्षपूर्वक ऐका. ते चुकवू नका. येशूने म्हटले, “योहान तो प्रकाश होता.” मलाखी 3, काही चूक नाही! महान चमकणारा प्रकाश असलेल्या संदेष्ट्याने ओळख दिली की येशूच तो एकमेव, “तो कोकरा” आहे. इतर सर्व कोकरे ज्याविषयी याजक बोलत होते, आणि त्या इतर सर्व गोष्टी, मूर्खपणाच्या होत्या. इथे “तो कोकरा” होता! तो मनुष्य ज्याकडे महान चमकणारा प्रकाश होता, जे येशूने म्हटले तो होता.

मलाखी 3 म्हणतो, “मी माझा दूत पाठवत आहे माझ्यापुढे मार्ग तयार करण्यासाठी.” आणि ज्याला मार्ग तयार करण्यासाठी पाठविले होते, त्याने त्याचे, स्थान ओळखले. “तोच आहे! यात काही चूक नाही. तोच आहे! मी त्याच्या मागे येणारे चिन्ह पाहतो. मला माहीत आहे की तो तोच आहे; एक प्रकाश आकाशांतून खाली येत आहे आणि त्याच्यावर जात आहे.” तो सकारात्मक होता, तो तोच होता.

108 मग, माझे भाऊ, मला तुम्हाला काही विचारायचे आहे, शेवटी. आपण असे म्हणू शकतो. मलाखी 4 मध्ये, आपल्याला दुसऱ्या गरुडाचे अभिवचन पण दिले नाही का, प्रकाशाचा एक स्तंभ मागे येत आहे, आजच्या भरकटलेल्या मंडळीला दाखवण्यासाठी की तोच हिब्रू १३:८ आहे, “काल, आज आणि युगानुयुग सारखेच”? आपल्याला अभिवचन दिले नाही का, की आणखीन एक मनुष्य रानातून उडत येईल? आमेन! ते अगदी सत्य आहे. लूक १७:३० मध्ये जसे लिहिले आहे, तसाच मनुष्याचा पुत्र (गरुड) स्वतःला प्रकट करणार आहे, हे किती योग्य आणि जुळणारे आहे इतर सर्व उपासना स्थळे शून्य करण्यासाठी, जसे संप्रदाय आणि इत्यादी!

परमेश्वराने त्याचे स्थान निवडले. योहान म्हणाला, “इथे आहे!”

109 आणि मग आपल्याला ह्या दिवसात त्याच गोष्टीचे अभिवचन दिले आहे, मलाखी 4, “मुलांचे हृदय फिरविण्यासाठी,” तो मेला नाही असे म्हणणे, ह्या गोष्टी दुसऱ्या युगासाठी नाहीत; येशूच्या नावाने बाप्तिस्मा पूर्वीसाठी नव्हता, परंतु तो आताही तसाच आहे. आमेन. इतर सर्व आराधना स्थळे शून्य करण्यासाठी, तेच अंतिम दिवसाचे गरुड करणार आहे, हे दाखविण्यासाठी की बाकी सर्व मुर्खता आहे, संप्रदाय हे मूर्खपणा आहे, परंतु त्यांना पुन्हा त्याच चिन्हाने दाखविण्यासाठी जे त्याने केले, की तो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे. हालेलुय्या!

110 तसेच, प्रकटीकरण ४:७ मध्ये आपल्याला चार प्राणी दिसतात, ज्यांचा आपण आत्ताच उल्लेख केला आहे.

पहिला, आम्हाला आढळला...समजले की, तो सिंह होता. तो पहिला प्राणी होता जो त्या दिवसाच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी पुढे गेला, यहुदा वंशाचा सिंह.

त्याच्यानंतर दुसरा प्राणी येतो. आणि आपण पाहिले, पुढचा प्राणी बैल होता, जो ओझे वाहून नेणारा प्राणी आहे, एक बलिदान. रोमन प्रमुख गिर्जाघरच्या दिवसात, मंडळी नष्ट झाली; बलिदान.

त्यानंतर, मनुष्य होता, तो मनुष्यासारखा चेहरा असलेला प्राणी होता. आणि तो मनुष्य सुधारक होता, मनुष्याचे शिक्षण, धर्मशास्त्र, आणि इत्यादी.

परंतु शेवटचा प्राणी जो उडणार होता, तो शेवटचा प्राणी जो येणार होता, बायबल म्हणते तो उडणारा गरुड होता. हाल्लेलुया! आणि संदेष्टा म्हणाला, ह्या दिवसात, “प्रकाश होईल.” ओह, माझ्या देवा! “त्या दिवशी प्रकाश असेल.”

111 तिथे सुधारकांचा दिवस आहे. एक दिवस असा आहे जो फक्त एक सावली आहे, जो दिवस किंवा रात्र बोलू शकत नाही. परंतु संध्याकाळच्या वेळी, गरुडाच्या वेळी:

तो प्रकाश गरुडाच्या वेळी होईल,
महिमेचा मार्ग तुम्हाला नक्कीच सापडेल;
जलमार्गात आज प्रकाश आहे,
येशूच्या मौल्यवान नावात गाडले गेले आहे.
तरुण आणि वृद्ध, तुमच्या सर्व पापांचा पश्चाताप करा,
पवित्र आत्मा निश्चितच तुम्हाला बाप्तिस्मा देईल;
कारण संध्याकाळचे प्रकाश आले आहे,
हे सत्य आहे की परमेश्वर आणि ख्रिस्त एक आहेत.

112 आमेन! संध्याकाळच्या वेळी प्रकाश होईल, परमेश्वराचे एकमेव निवडलेले आराधनेचे स्थान. ओह, हा संदेश कसा उपयोग झाला आहे, तो काय करणार आहे? आणि त्याच्या दिवसात संध्याकाळच्या वेळी प्रकाश होईल, आणि (काय?) त्याच्या मुलांचे खऱ्या अभिवचन दिलेल्या देशात स्वागत करण्यासाठी, अग्नीस्तंभाच्या त्याच चिन्हाद्वारे ज्याने इस्त्राएल लोकांना जंगलातून मार्गदर्शन केले.

परमेश्वराने आराधनेसाठी निवडलेले स्थान, येशू ख्रिस्त. तिथे तेच एक स्थान आहे. तोच एकमेव नाव आहे जे परमेश्वराचे तारणासाठी आहे. हेच त्याने स्वर्गातील कुटूंबाला नाव दिले आहे, जेव्हा ते पृथ्वीवर आहे, येशू ख्रिस्त आहे.

113 ओह मंडळी, ओह लोकहो, पापी मित्रांनो, येशू ख्रिस्ताशिवाय दुसऱ्या कशावरही विश्वास ठेवू नका. कोणत्याही प्रचारकावर विश्वास ठेवू नका. तुमचा तारण करण्यासाठी

दुसऱ्या कोणावरही विश्वास ठेवू नका. कोणत्याही मंडळीवर, कोणत्याही पंथावर, कोणत्याही संप्रदायावर विश्वास ठेवू नका. फक्त येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा, कारण तो या समयाचा प्रकाश आहे.

आपण आपली डोके झुकवूया.

संध्याकाळच्या वेळी प्रकाश होईल.
महिमेचा मार्ग तुम्हाला नक्कीच सापडेल;
जलमार्गात आज प्रकाश आहे,
येशूच्या मौल्यवान नावात गाडले गेले आहे.
तरुण आणि वृद्ध, तुमच्या सर्व पापांचा पश्चाताप करा,
पवित्र आत्मा निश्चितच आत येईल;
संध्याकाळचे प्रकाश आले आहेत,
हे सत्य आहे की परमेश्वर आणि ख्रिस्त एक आहेत.

114 ओह, भाऊ, बहिणींनो, जर तुम्ही अजून पश्चाताप केला नाही, जर तुम्ही येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतला नाही, आज रात्री तुम्ही त्याची सुरुवात कराल का? तुम्ही परमेश्वराला त्या स्थानी तुमचे स्वागत करण्याची संधी द्याल जिथे तुम्ही त्याची आराधना करु शकता? लक्षात ठेवा, त्या बाहेर, असा कोणताही स्थान नाही जिथे परमेश्वराने तुम्हाला भेटण्याचे आणि तुमच्या आराधनेचे स्वागत करण्याचे अभिवचन दिले आहे.

115 तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, मी प्रामाणिकपणे आराधना करतो!" तसेच काईननेही केली. त्याने प्रत्येक प्रकारचे अर्पण केले जे हाबेलाने केले, परंतु ते चुकीचे अर्पण होते. तुम्ही कदाचित मंडळीत जाऊ शकता, आणि तुमचा दशांश देऊ शकता, आणि ख्रिस्ती म्हणून तुमचे कर्तव्य पार पाडू शकता, कोणत्याही पुरुष किंवा स्त्रीइतकेच प्रामाणिक.

मी इथे मागील तीस वर्षांपासून, शहराभोवती उभा राहिलो, आणि हाच संदेश ओरडत आलो आहे. मी वृद्ध होत आहे. मी तुमच्याबरोबर जास्त वेळ राहू शकत नाही. परंतु लक्षात ठेवा, न्यायाच्या दिवशी, माझा आवाज रेकॉर्ड केलेला आहे, आणि तो तुमच्याविरुध्द बोलेल.

116 फक्त एकच स्थान आहे जिथे परमेश्वर त्याचे नाव ठेवतो, आणि ते मंडळीमध्ये नाही, परंतु येशूमध्ये आहे. फक्त एकच आराधनेचे स्थान आहे, फक्त एकच जागा जी तुम्हाला स्विकारले गेले आहे, आणि ती म्हणजे प्रिय, येशू ख्रिस्तामध्ये. "स्वर्गाखाली असे दुसरे नाव मनुष्यांमध्ये दिलेले नाही, ज्याद्वारे तारण होईल," मंडळी नाही, पंथ नाही, काहीच नाही. येशू ख्रिस्त!

आणि तोच या वेळेचा संदेश असायला हवा, "मुलांचे हृदय पुन्हा एकदा त्या विश्वासाकडे फिरविण्यासाठी जे संत जनांना देण्यात आला होता." आज रात्री तुम्ही त्याचा स्विकार करणार नाही का?

आणि आपण आपली डोके झुकलेली असताना.

117 आणि ज्या लोकांना वाटते की त्यांना प्रार्थनेत स्मरण केले जावे, त्यांनी कृपया आपले हात वर करा. आपण वेदीसमोर बोलावणी करू शकत नाही, कारण लोकसंख्या खूप मोठी आहे. परमेश्वर तुमहाला आशिर्वादित करो. माझ्या देवा! माझ्या डाव्या बाजूला, मला वाटते की सुमारे तीनशे लोक आहेत.

118 आता माझ्या उजवीकडे, तुम्ही तुमचे हात वर कराल, व म्हणाल, "मला आठवणीत ठेवले जावे." मला वाटते दीडशे, किंवा त्या अधिक, माझ्या उजवीकडे आहेत.

इथे खाली आपले आराधनालय आहे ज्यामध्ये पाण्याचा मोठा तलाव आहे; पाळक, एक चांगला पाळक, भाऊ ऑर्मन नेविल, सहकारी, ही माणसे इथे सभोवती जे तुम्ही पाहता आणि भेटता. दररोज, प्रत्येक रात्री, प्रत्येक तासाला, लोक ज्यांना बाप्तिस्मा घ्यायचा आहे, ज्यांनी पश्चाताप केला आहे, ते सदैव वाट पाहत आहेत. आणि जर तुम्ही त्या आज्ञेचे पालन करता, तुम्ही निश्चिंत आहात, देवाच्या अभिवचनाद्वारे, जर तुम्ही तुमच्या हृदयाने प्रामाणिक असाल, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळण्यासाठी.

119 एकच आराधनेचे स्थान आहे. आता, ते आराधनालयात नाही. ते ख्रिस्तामध्ये आहे. आपण त्याच्यामध्ये कसे येऊ शकतो? "एका आत्म्याने आपण सर्वांनी ह्या एका शरीरात बाप्तिस्मा घेतले आहे."

आपण प्रार्थना करूया.

120 प्रिय परमेश्वर, जसे हे हात वर गेले, ते त्या हाताखाली हृदयात काय आहे हे दर्शवितात, त्यांना खात्री आहे की त्यांना तुझ्या मदतीची गरज आहे. पिता, मी त्या प्रत्येकासाठी प्रार्थना करतो. आणि मी तुझे वचन उद्धृत करणार आहे. तुम्ही म्हणालात, "जो माझे वचन ऐकतो, आणि ज्याने मला पाठविले त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याच्याकडे सार्वकालिक जीवन आहे, आणि त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही; तो मरणातून जीवनात पार गेला आहे."

पिता, काही आठवड्यापूर्वी शहरातून निघून गेलेला, परत आला, त्याने विचारले, "*ह्या* विषयी?"

"का, ते गेले आहेत?"

"बरं, त्याविषयी काय..."

"ते गेले आहेत."

121 प्रिय परमेश्वर, एक एक करून आम्हाला बोलावले जाते, एकामागून एक आपल्याला मृत्यूच्या सावलीच्या दरीतून चालत जाण्याच्या आव्हानाला सामोरे जावे लागेल. आणि ते आपल्या प्रत्येकजण वर बंधनकारक आहे, नश्वर म्हणून. पण, आज रात्री, तुम्ही आम्हाला तुमची विनंती दिली आहे, की जर आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याच्या नावात बाप्तिस्मा घेतला, तर तू आम्हाला आत घेशील. आणि मग ह्या शरीरात, ख्रिस्ताच्या शरीरात, मंडळीत नाही, परंतु ख्रिस्ताच्या शरीरात, त्या शरीराचा न्याय अगोदरच झाला आहे. त्याला न्यायामध्ये यावे लागणार नाही. परमेश्वराने त्याचा क्रोध त्या शरीरावर ओतला, आणि ते शरीर पापापासून मुक्त आहे; आणि, त्याच्यामध्ये असल्यामुळे, आपल्याला पापापासून मुक्त करतो, त्याच्या प्रायश्चिताद्वारे जो आपल्यासाठी मेला. आणि तिथे आमची एकमेकांशी सहभागिता आहे, तर येशू ख्रिस्ताचे रक्त, परमेश्वराचा पुत्र, आपल्याला सर्व पाप आणि मलीनतेपासून शुध्द ठेवते.

122 पिता परमेश्वर, मी प्रार्थना करतो की तू त्या प्रत्येकाला तुझ्या राज्यात घे. परमेश्वर, ते प्रदान कर. त्यांच्यापैकी एकही हरवू नये; एखादा मुलगा किंवा मुलगी, पुरुष किंवा स्त्री हरवू नये. प्रभू, आज रात्री माझे स्वतःचे काही लोक इथे बसले आहेत, ते त्या रक्ताच्या बाहेर आहेत. मला माझ्या वडिलांचे शब्द किती चांगले आठवतात! आणि मी प्रार्थना करतो, प्रिय परमेश्वर, की त्यांच्यातील कोणीही नाश पावणार नाही. प्रभू, तसे होऊ दे. मी आता तुझ्यावर विश्वास ठेवत आहे, माझ्या पूर्ण मनाने.

123 माझ्या बंधू, बहिणींवर, माझ्या मित्रांवर, आज रात्री या ठिकाणी आणि तिकडे दूर फोनवर असलेल्यांवर कृपादृष्टी कर. पूर्व किनाऱ्यापासून पश्चिमेपर्यंत, अनेक राज्ये ऐकत आहेत. मी प्रार्थना करतो, प्रिय परमेश्वर, टूसनच्या वाळवंटात, कॅलिफोर्नियामध्ये, नेवाडा आणि आयडाहोमध्ये, पूर्वेला आणि आजूबाजूला, पुढे टेक्सासमध्ये; जेव्हा हे आमंत्रण दिले जात आहे, तेव्हा लोक, लहान मंडळी, इंधन केंद्र, घरांमध्ये—मध्ये बसून ऐकत आहेत. हे परमेश्वर, हरवलेला पुरुष किंवा स्त्री, मुलगा किंवा मुलगी, ह्या समयी, तुझ्याकडे येवो. ते आताच होऊ दे. आम्ही येशूच्या नावाने मागतो, की त्यांना हे सुरक्षित स्थान मिळेल जोपर्यंत वेळ आहे.

जेव्हा, आपण भिंतीवर हस्तलेख पाहतो, पृथ्वी चिंताग्रस्त होत आहे, मुक्तीचा समय जवळ आहे. आपल्या राष्ट्राचा एक भाग बुडत आहे, दुसरा भाग हलत आहे आणि भूकंपाने फुटत आहे, जसे येशूने अभिवचन दिले आहे. प्रभू, त्यांना जास्त वेळ नको लागू दे. त्यांनी ते आता स्विकारावे, कारण आम्ही ते येशूच्या नावाच्या सुसमाचाराच्या, सभेचे पारितोषिक म्हणून तुला सादर करीत आहोत. आमेन.

124 तुम्ही त्याच्यावर विश्वास करता का? परमेश्वर तुम्हाला आशिर्वादित करो. माझ्या डावीकडे, किती जण विश्वास करतात की ते सत्य आहे? तुमचे हात वर करा. माझ्या उजवीकडे किती आहेत? तुमचे हात वर करा. परमेश्वर तुम्हाला आशिर्वादित करो. जितपर्यंत मी पाहतो, प्रत्येकजण. मित्रांनो, हे सत्य आहे. परमेश्वर जाणतो ते खरे आहे.

125 आता त्याच्यामध्ये असताना, आणि त्याच्यामध्ये असून, तुम्हाला प्रत्येक गोष्टीत प्रवेश आहे ज्यासाठी तो मेला. आणि तो कशासाठी मेला? "तो आपल्या अपराधांमुळे घायाळ झाला, आपल्या दुष्कर्मामुळे ठेचला गेला; आपल्या शांतीची शिक्षा त्याच्यावर होती, आणि त्याच्या फटक्यांनी आपल्याला बरे केले गेले." तुमचा त्यावर विश्वास आहे का? आता तुम्ही बरे होण्यासाठी त्याच्या प्रायश्चितावर विश्वास करता का?

126 आपल्यामध्ये कोणी आजारी आहे का? त्यांनी आपले हात वर करु दे, उजवा किंवा डावा. आजारपणाची मोठी गर्दी. मी पंक्तिसाठी बोलवू शकत नाही. तुम्ही पाहा, मी... मंचावर येऊ शकत नाही. ते करण्याचा कोणताही मार्ग नाही.

ते इतर ठिकाणी, आजारी लोकांसाठी प्रार्थना सभा करत आहेत, मंडळ्या आणि अशा जागेमध्ये, भवन मध्ये.

मी तुम्हाला काहीतरी विचारणार आहे. किती विश्वासी आहेत? तुमचे हात वर करा. ठीक आहे. मी तुम्हाला वचनाचा उल्लेख करणार आहे, जो ख्रिस्त आहे. येशूचे शेवटचे कार्यदेश जगासाठी, आणि मंडळीसाठी, खरं तर, त्यानी असे म्हटले, "विश्वास ठेवणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असतील; जर त्यांनी आपले हात आजाऱ्यांवर ठेवले, तर ते बरे होतील." किती जणांना हे खरे आहे हे माहीत आहे, मार्क 16, म्हणा, "आमेन." [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] ठीक आहे. एक विश्वासी म्हणून मी तुम्हाला तुमच्यासमोर कोणावर तरी हात ठेवण्यास सांगत आहे. फक्त तुमचे हात तुमच्यासमोर असलेल्या कोणावर तरी ठेवा, आणि आता आपण प्रत्येकजण एकमेकांसाठी प्रार्थना करुया. आपल्या सभोवती कोणावर तरी हात ठेवा.

127 प्रभू, इथे माझ्यासमोर रुमालांची पेटी, लहान वस्तूंचे तुकडे आहे; कुठलीतरी वृध्द आई कुठेतरी पडलेली, मरत आहे, एक बाळ मृत्यूच्या जवळ आहे, सर्वत्र आजारी लोक. आपण बायबलमध्ये वाचतो की त्यांनी पौलाच्या शरीरातून रुमाल आणि कपडे घेतले, आणि ते आजाऱ्यांवर ठेवले; आणि दुष्ट आत्मे, आणि अशुध्द आत्मे, आणि आजार, आणि रोग, लोकांतून निघून गेले. आता, प्रभू, आम्हाला ठाऊक आहे की आम्ही संत

पौल नाही, परंतु आम्हाला ठाऊक आहे की तू अजूनही येशू आहेस, परमेश्वराने दिलेले एकमेव आराधनेचे स्थान. आणि आता, आज, ह्या लोकांनी त्यांचा विश्‍वास तसाच कबूल केला आहे, त्या लोकांसारखा विश्वास करत आहे. निश्चितच तू त्यांच्यासाठी मार्ग तयार केला आहेस! आणि मी माझे हात ह्या रुमालांवर ठेवतो आणि मागतो की रोग आणि पीडा येशू ख्रिस्ताच्या नावाने लोकांच्या शरीरातून दूर होऊ दे, ज्यांच्यावर हे ठेवले जातील.

128 आता, आपल्याला शिकवले आहे, की इस्त्राएल मिसरमधून, कर्तव्याच्या पंक्तीत बाहेर येत होता, ते अभिवचन दिलेल्या देशाच्या मार्गावर होते. लाल समुद्र त्यांच्या मार्गात आला. आणि परमेश्वराने अग्नीस्तंभातून खाली पाहिले, आणि समुद्र भयभीत झाला, मागे सरकला, आणि इस्त्राएलला वचन दिलेल्या देशात जाऊ दिले. हे परमेश्वर, आजच्या रात्री, येशूच्या रक्ताद्वारे खाली पाहा, आणि आजार मागे जाऊ दे, आणि सैतानाला बाहेर निघू दे. आणि लोकांनी त्या चांगल्या आरोग्य आणि सामर्थ्याच्या वचनाकडे जावे, जे परमेश्वर म्हणाला, "सर्व गोष्टींपेक्षा, माझी इच्छा आहे की तुझे आरोग्य चांगले व्हावे."

129 आता जसे तू तिथे पाहतो, प्रभू येशू, ह्या लोकांचे हात एकमेकांवर ठेवलेले आहेत, ते त्यांच्या विश्‍वासाचे प्रतीक आहेत, जे तू म्हणाला, "विश्‍वास ठेवणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असतील." ते त्यांच्या स्वतःच्या पद्धतीने एकमेकांसाठी प्रार्थना करत आहेत. पुढची व्यक्ती त्यांच्यासाठी प्रार्थना करत आहे.

130 आता, प्रभु, हे आव्हान पूर्ण झाले आहे, सैतान हा मोठा फसवणारा आहे, त्याला परमेश्वराच्या मुलाला धरून ठेवण्याचा काहीही अधिकार नाही. तो एक हारलेला व्यक्ती आहे. येशू ख्रिस्त, एकमेव आराधनेचे स्थान, एकच खरे नाव, त्याला कलवरीवर हरवले. आणि आपण आता त्याच्या रक्ताचा दावा करतो, की त्याने प्रत्येक आजार, प्रत्येक रोग पराभव केला.

आणि मी सैतानाला या श्रोत्यांना सोडून जाण्यास सांगतो. येशू ख्रिस्ताच्या नावाने, ह्या लोकांतून बाहेर ये, आणि ते मुक्त होऊ दे.

131 प्रत्येकजण जे लिखित वचनाच्या आधारावर त्यांचे आरोग्य स्वीकारतात, आपल्या पायावर उभे राहून आपली साक्ष द्या आणि म्हणा, "आता मी येशू ख्रिस्ताच्या नावाने माझे आरोग्य स्वीकारतो." तुमच्या पायावर उभे राहा.

परमेश्वराची स्तुती असो! हेच आहे. इथे पाहा, अपंग लोक आणि इतर उठून उभे होत आहे. परमेश्वराची स्तुती असो! बस इतकंच. फक्त विश्वास ठेवा. तो इथे आहे. किती अद्भुत!

132 बाहेर प्रेक्षकांमध्ये, बाहेर, तारांजवळ, तुम्ही पाहिले पाहिजे! मला वाटते की इथे प्रत्येक व्यक्ती, जितके मला माहीत आहे, किंवा त्यांच्यातील बहुतेक, या समयी उभे आहेत. ओह, किती अद्भूत वेळ आहे! प्रभूची उपस्थिती, तेच तर! "तिथे प्रभूची उपस्थिती आहे, तिथे स्वातंत्र्य आहे, तिथे स्वतंत्रता आहे." परमेश्वराचा आत्मा आपल्याला स्वतंत्र करतो.

133 आता त्याने आपल्याला बरे केले आहे, आपण त्यावर विश्‍वास करतो. त्याने आपल्याला वाचवले; आपण त्यावर विश्‍वास करतो. ज्यांना बाप्तिस्मा घ्यायचा आहे, तलाव तयार आहे. केव्हाही, कोणत्याही वेळी जेव्हा तुम्हाला यावेसे वाटेल, तिथे कोणीतरी उपस्थित असेल.

आणि आता मला वाटते, आपण बंद करण्यापूर्वी, आपण मंडळीचे एक जुने गीत गायले पाहिजे. "मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो कारण त्याने प्रथम

माझ्यावर प्रेम केले.” परमेश्वरासमोर आपले हात वर करा आणि आपल्या संपूर्ण हृदयाने ते गाऊया!

आम्हाला इथे सकाळी, साडे नऊ वाजता, त्याच इमारतीत तुम्हाला भेटायचे आहे, *विवाह आणि घटस्फोट* या विषयासाठी. ठीक आहे.

आता आपण एकत्र गाऊया.

मी त्याच्यावर प्रेम करतो,

या महान प्रेषकांना ते गाऊ द्या! बाहेर ताऱ्यांवर, सुध्दा, ते गा.

कारण त्याने प्रथम माझ्यावर प्रेम केले
आणि माझे तारण विकत घेतले
कलवरीच्या झाडावर.

134 ते कुठे केले होते? कलवरीच्या झाडावर. आपण ते पुन्हा गात असताना, आपण आपल्या सभोवती कोणाशी तरी हात मिळवुया, म्हणुया, “यात्रेकरू, परमेश्वर तुला आशिर्वादित करो.”

मी...(...?...)
कारण त्याने प्रथम...
आणि माझे तारण विकत घेतले
वर...

135 ओह, तुम्ही त्याच्यावर प्रेम करत नाही काय? तो अद्भूत नाही का? तो तुमची लपण्याची जागा आहे का? तो थकलेल्या भूमीत एक खडक आहे, वादळाच्या काळात एक आश्रय आहे, मी ओळखतो तोच एकमेव निवारा आहे. म्हणून:

माझा विश्‍वास तुझ्याकडे पाहतो,
तू कलवरीच्या कोकऱ्या,
हे तारणारा दैवी;
आता मी प्रार्थना करीत असताना माझे ऐक,
माझे सर्व अपराध दूर कर,
मला ह्या दिवसापासून
पूर्णपणे तुझे होऊ दे!

आपण ते गात असताना आपले हात वर करुया.

माझा विश्‍वास तुझ्याकडे पाहतो,
तू कलवरीच्या कोकऱ्या,
हे तारणारा दैवी;
आता मी प्रार्थना करीत असताना माझे ऐक,
माझे सर्व पाप दूर कर,
ओह मला ह्या दिवसापासून
पूर्णपणे तुझे होऊ दे!

आता आपण आपली डोके झुकवूया व ते गुणगुणूया.

जेव्हा मी जीवनाच्या अंधाऱ्या भूलभुलैय्यातून चालतो,
आणि माझ्या सभोवती दु:ख पसरते,
तू माझा मार्गदर्शक बन;

अंधार दिवसात बदलतो,
दु:खाचे अश्रू पुसून टाक,
मला कधीही भटकू देऊ नको
तुझ्यापासून दूर.

तुम्ही तुमची डोके झुकलेली असताना, आमचे प्रिय पाळक, भाऊ ऑर्मन नेविल, श्रोत्यांना सोडण्यास सांगतील.

65-0220 परमेश्वराने निवडलेले आराधनेचे स्थान
पार्कव्यू ज्युनियर हायस्कूल
जेफरसनविले, इंडियाना संयुक्त राज्य.

MARATHI

©2026 VGR, ALL RIGHTS RESERVED

Voice Of God Recordings, India Office
19 (New No: 28) Shenoy Road, Nungambakkam
Chennai 600 034, India
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

Voice Of God Recordings
P.O. Box 950, Jeffersonville, Indiana 47131 U.S.A.
www.branham.org

## कॉपीराइट सूचना

सर्व हक्क राखीव. हे पुस्तक वैयक्तिक वापरासाठी होम प्रिंटरवर छापले जाऊ शकते किंवा येशू ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाचा प्रसार करण्यासाठी एक साधन म्हणून विनामूल्य दिले जाऊ शकते. हे पुस्तक विकले जाऊ शकत नाही, मोठ्या प्रमाणावर पुनरुत्पादित केले जाऊ शकत नाही, वेबसाइटवर पोस्ट केले जाऊ शकते, पुनर्प्राप्ती प्रणालीमध्ये संग्रहित केले जाऊ शकते, इतर भाषांमध्ये अनुवादित केले जाऊ शकते किंवा व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स® च्या स्पष्ट लेखी परवानगीशिवाय निधीची मागणी करण्यासाठी वापरले जाऊ शकत नाही.

अधिक माहितीसाठी किंवा इतर उपलब्ध सामग्रीसाठी, कृपया संपर्क साधा:



VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org